म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा.वा.
दा. क्र. ७०७५४

IRBK-0117054
IRBK-0117054

१७०५४
वाचनालय
२५।८।७७
वा.वा.

# झंप्या द ग्रेट

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १७०५४ नों. दि ...........
वि. ७२.९१ ... क्र. ...............

IRBK-0117054
IRBK-0117054

सौ. गिरिजा कीर

झंप्या द ग्रेट

० ०

लेखिका : सौ. गिरिजा कीर

० ०

© सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

० ०

मुद्रक–प्रकाशक : सर्जेराव जी. घोरपडे

० ०

मुद्रण : प्रिंटेक्स्ट, पुणे ३०.

० ०

प्रकाशक : प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे ३०.

० ०

प्रथमावृत्ती : मार्च १९७७

० ०

किंमत : रुपये चार



अवखळ, उचापत्या,
चलाख आणि धीट
झंप्या द ग्रेट

- झंप्याचे प्रसंगावधान
- झंप्याने धडा शिकवला
- झंप्याची दिवाळी
- झंप्या सातासमुद्रापार...
- झंप्या पोहायला शिकतो
- केकबहाद्दर झंप्या झिंदाबाद
- फायटर झंप्या

# १ : झंप्याचे प्रसंगावधान

एक होता झंप्या. महा चळवळचा. महा वळवळचा. बघावं तेव्हा नसत्या उद्योगात गढलेला. अति चौकस. सगळ्या गोष्टी बारकाईनं टिपेल, काहीतरी विचार करून त्यावर तोडगा शोधून काढेल. कोणत्याही बाबतीत झंप्याचं डोकं नेहमी तिरकस चालायचं. मग तो असे काही उपद्व्याप करून ठेवायचा की, आई वैतागून म्हणायची, 'बाबारे, तुझी मदत नकोय मला. देवासारखा गप्प बस. तुझा तू अभ्यास सांभाळलास तरी उपकार होतील मोठे '

त्यावर झंप्या तडफदारपणानं म्हणायचा, 'आई, आता मी मोठा झालोय; मला सगळं समजतं.'

आई हसून म्हणायची, 'एवढासा नकटोबा आणि वर म्हणे समजतं!'

आई असं म्हणाली तरी झंप्या मोठा शहाणा होता. आपणहून पुढे होऊन तो काही ना काही मदत करत राहायचा. एकदा तर त्यानं मोठी धमालच केली.

शेजारच्या बिल्डिंगमधून कुठूनतरी हाऽ मोठा धुराचा लोट येत होता. झंपूरावांना ते दिसलं. मग ते गप्प बसणार थोडेच! डोळे मोठ्ठे मोठ्ठे करून त्यानं निरखून पाहिलं. मधेच धूर, मधेच आगीचा लोळ! अरे अरे,! केवढी ही आग! कुणा तरी बिचाऱ्याचं घर नक्कीच भस्मसात होणार. झंप्या विचारात पडला. काय बरं करावं? त्यानं आपल्या बरोबरीचे मित्र जमवले. त्यांना ती आग दाखवली. सगळेच वीर घाबरले. मग झंप्यानं युक्ती काढली. प्रत्येकानं घरातून बादली भरून पाणी आणायचं

आणि आग विझवायची. पण झंप्याचं ऐकायला कुणीच तयार होईना. तो जाम वैतागला आणि तडफदारपणानं म्हणाला, 'आलात तर तुमच्यासह, नाही तर एकटा—'

झंप्या एकटाच धीटपणानं निघाला. त्यानं हळूच घरात पाऊल टाकलं. पण एवढ्यात आई कडाडली, 'मेल्या, पाच मिनिटं काही पडू देऊ नकोस. जीव खा नुसता आईचा!'

झंप्यानं धूम ठोकली ती थेट खालच्या अंगणात. आता मात्र त्याचं डोकं वेगळ्याच दिशेनं काम करू लागलं.

मागे एकदा त्याच्या मित्राच्या बिल्डिंगला अशीच आग लागली होती. तेव्हा त्याच्या वडिलांनी आग विझवण्यासाठी फोन केल्याचं त्याला आठवलं. आपणही तस्साच फोन करायला हवा. झंप्या ताडकन् उठला. धावत धावत जोशी काकूंकडे गेला. त्याला वाटलं, काकूंना विचारावं, आग लागली तर फोन नंबर कुठला फिरवायचा हो! पण त्यांच्या चेहऱ्याकडे बघून त्याला भीतीच वाटली. नीट काही उत्तर द्यायच्या-ऐवजी त्या बखोट धरून घालवून देतील याची खात्री पटली. मग काही न बोलता तो हळूच त्यांच्या दिवाणखान्यात आला. भिंतीवर एका कार्डावर महत्त्वाचे फोन नंबर लिहून ठेवलेले होते. त्याला ते माहीत होतं. तो बारकाईनं नंबर बघायला लागला. पण त्याला बंबवाल्यांचा फोन काही दिसेना. शेवटी त्यानं पोलिसांचा नंबर फिरवला आणि घाई-घाईत आग लागल्याची बातमी पुरवली. अर्थातच जोशीकाकू बाहेरच्या खोलीत येईपर्यंत अर्धं अधिक त्याचं बोलून झालं होतं. 'काय उचापत-खोर कार्टं आहे—' असं पुटपुटत त्यांनी त्याच्या हातातला फोन ओढून घेतला. पण तेवढ्यात बातमी सांगून झाली होती. झंप्यानं जोशीकाकूं-कडून वेगानं पळ काढला. अर्थातच आईला ही बातमी कळणार आणि आपल्याला खरपूस मार बसणार म्हणून तो गुपचुप जाऊन कॉटखाली लपून राहिला. बंबवाले आले की, आपण किती चांगलं काम केलं, याची सगळ्यांना खात्री पटेल आणि आपल्याला आपोआप शाबासकी मिळेल हे त्याला नक्की माहीत होतं.

पंधरा एक मिनिटांतच ढण् ढण् घंटा वाजवत बंबवाले आले.

लोकांची गर्दी जमली. पण आग कुठे लागलीय हे कुणालाच कळेना. बाजूच्या अंगणातून डांबर वितळवण्याचं काम चाललं होतं. त्याचा हा ऽ मोठा धूर झाला होता. मधेच आगीची ज्वाळाही दिसत होती. काय घोटाळा झाला आहे हे कळल्यावर फायर ब्रिगेडचे लोक अतिशय संतापले. फोन कुणी केला याची चौकशी सुरू झाली. जोशीबाई तणतणतच बाहेर आल्या. पण झंप्याचा पत्ता होता कुठं ? सर्वांची समजूत काढता काढता आईची मात्र पुरेवाट झाली. गर्दी ओसरल्यावर झंप्या हळूच कॉटखालून बाहेर पडला. त्याच्या उचापतींनी वैतागलेल्या आईनं त्याला दणकून मार दिला. पण झंप्या मात्र आईला पुन्हा पुन्हा म्हणत राहिला, 'आई ग, मी खरंच आग विझवायला फोन केला, मी मदत करायला गेलो तर तू मलाच मारतेस—'

त्यावर आई कळवळून म्हणाली, 'बाबा रे, आपल्याला नाही अक्कल तर गप्प तरी बसावं!'

झंप्याला मोठा राग आला. 'आपल्याला अक्कल नाही म्हणे! वा रे वा! खरंच खूप खूप शहाणा आहे मी. आईला हे पटवून देईन तरच नावाचा झंप्या!' झंप्यानं निश्चय केला आणि खरंच आपलं शहाणपण त्यानं सिद्ध करून दाखवलं.

अशीच एक दिवस ही गोष्ट घडली—

दुपारची वेळ होती. चाळीतली पुरुष माणसं कामावर गेली होती. दादा ट्रीपला गेला होता. आणि कॉलेजचं गॅदरिंग आहे, म्हणून ताई सकाळपासूनच गुल् होती. झंप्या मात्र पेंगत पेंगत मराठ्यांचा इतिहास पाठ करत होता. आई बाजूला बसून तांदूळ निवडत होती, एवढ्यात उकिडव्यांच्या आजी आल्या. आठवल्यांच्या आजी पण आल्या. त्यांच्या जोरजोरात गप्पा सुरू झाल्या. झंप्याची झोप खाड्कन उडाली. हुडुत्! आता कोण करतो अभ्यास? झंप्यानं इतिहासाचं पुस्तक बाजूला भिरकावून दिलं आणि तो गप्पा ऐकायला येऊन बसला. दुपारच्या गप्पा ऐकायला त्याला मस्त मजा वाटायची. काय काय गमती-जमती ऐकायला मिळायच्या एकेक! अभ्यास टाकून झंप्या तिथं येऊन बसलेला बघून आईला भारी राग आला. तिनं हे ऽ एवढाले बटाट्याएवढे डोळे

करून त्याच्याकडं पाहिलं. पण झंप्या कसला खट ! तो आजींच्या गमती-जमती ऐकण्यात केव्हाच रंगून गेला होता. एवढ्यात गेटजवळ 'च्यावल बाऽय' म्हणून हाक मारत, एक तांदूळवाली आत आली. तांदूळ सुरेखच होता; तिघींनीही तांदूळ घ्यायचं ठरवलं. बाईजवळ पंचवीस किलो तांदूळ होते. तिघींनी वाटून घ्यायचं ठरवलं. झालं, सगळ्यांची बैठक जमली. आई डबा आणि सूप आणायला आत गेली. आठवले आजी गोणपाटाची पिशवी आणायला गेल्या. उकिडवे आजी भली मोठी पातेली आणायला गेल्या. त्या तिघीजणी पैसे आणि सामान आणीपर्यंत ती तांदूळवाली आपल्या बरोबरच्या माणसांशी काही तरी बोलत होती. झंप्याला तिचं बोलणं मुळीच कळत नव्हतं. पण तिच्या बरोबरीचा तो काळगेला माणूस आणि बाजूला उभी असलेली, झिपऱ्या पिंजारलेली मुलगी त्याला आवडली नाही. त्याला एकदम आठवलं, मागे एकदा त्याच्या मित्राच्या घरी काहीतरी बनवाबनवी करून अशाच कुणी तांदूळवाल्या पळून गेल्या होत्या. तशी तो धावत वर गेला. आईला म्हणाला, 'आई ग, या बाया की नाही चोरट्या असतात, तू मुळीच तांदूळ घेऊ नकोस.' आईनं त्याच्या दंडाला धरून त्याला घरात बसवलं आणि ती रागानं ओरडली, 'चूप बस मेल्या, ज्यात त्यात अडमडायला हवं. आम्ही तिघीतिघी आहोत तांदूळ घ्यायला, तू नको काळजी करूस, मी तांदूळ घेऊन येईपर्यंत घरावर लक्ष ठेव.' एवढं सांगून आई सूप आणि डबा घेऊन खाली गेली. झंप्या अगदी विचारात पडला, आता काय करावं या आईला ! हिला काहीसुद्धा कळत नाही. ही फसेल आणि मग बाबांच्याकडून रागावून घेईल. त्याला बाबांचा रागीट चेहरा आठवला. आईचं काही चुकलं की बाबा जोरजोरात ओरडायचे, 'एवढ्या मोठ्या झालात तरी काही अक्कल नाही तुम्हाला. तुम्हाला काय, कुणीही फसवावं.' मग आई हळूच नाकडोळे पुसायची, झंप्याला भारी वाईट वाटायचं. आई पुन्हा पुन्हा अशी का वागते हेच कळायचं नाही. आतादेखील झंप्याचं न ऐकता आईनं त्यालाच दम भरून गप्प बसवलं होतं. झंप्या वरून डोकावून पाहत होता. खाली तांदळाचा व्यवहार संपला होता. आता या बायका पैसे घेऊन पसार

होतील हे त्याला माहीत होतं. त्याला एक युक्ती सुचली. तो मागच्या जिन्यानं हळूच रस्त्यावर आला. त्या तांदूळवाल्यांना गाठण्यासाठी कोपऱ्यावरच्या चौकात जाऊन उभा राहिला. पाचच मिनिटांत ती बाई, तिच्या बरोबरचा तो काळगेला माणूस आणि ती झिपऱ्यावाली मुलगी भराभरा येताना त्याला दिसली. तो पुढे होऊन म्हणाला, 'अहो तांदूळवाल्या बाई, तांदूळ आहेत का? वरच्या मजल्यावरच्या मावशींना हवे आहेत.' तांदूळवालीनं त्या काळच्या माणसाकडे पाहिलं. 'अभी लेके आता हूँ' असं सांगून तो समोरच्या गल्लीत शिरला. झंप्या मात्र घाई-घाईनं त्या चाळीत शिरला. तिसऱ्या मजल्यावर जाऊन त्यानं टाळ्या वाजवून त्या तांदूळवालीला वर बोलावलं आणि तिथल्या निमामावशी-कडे जाऊन त्यानं तांदूळवालीला बोलावून घ्यायला सांगितलं. 'मी



झंप्याने लबाड तांदुळवालीला बरोबर ओळखलं

आईला आता घेऊन येतो, तोपर्यंत तू तांदुळाचा भाव ठरव. तिला जाऊ देऊ नकोस–' असं सांगून झंप्या पसार झाला. काय घोटाळा आहे हे निमामावशीच्या लक्षातच येईना. पण काहीतरी गडबड आहे हे तिनं तावडतोब ओळखलं. तांदूळवाली तांदूळ घेऊन येईपर्यंत दहा एक मिनिटं तरी गेली. तेवढ्यात झंप्या आपल्या चाळीपर्यंत पोहोचला देखील.

इकडे चाळीत बरीच गडबड उडाली होती. तांदूळवाली गेल्यावर तिघीही तांदूळ वाटून घ्यायला बसल्या होत्या. पण दोनदोनदा मोजले तरी पंचवीस किलोचे पंधरा किलोच भरत होते. आई कपाळावर हात मारून बसली होती. शेजारच्या देशपांडे काकू तावातावानं व्याख्यान देत होत्या, 'मेल्या महा लवाड असतात ह्या तांदूळवाल्या. कधी घेऊ नये यांच्याकडून काही.' देशपांडेबाईचं व्याख्यान ऐकायला झंप्या थांबलाच नाही. त्यानं आईच्या हाताला धरलं आणि भराभरा जिना उतरायला सुरुवात केली. आई मोठ्यानं ओरडत होती, 'अरे, चाललास कुठे मला घेऊन?'

'तू चल आधी. त्या तांदूळवालीला मी पकडून ठेवली आहे.'

झंप्याचं बोलणं सगळ्याजणी ऐकत होत्या. झंप्याच्या आईच्या पाठोपाठ उकिडवे आजी आणि आठवले आजी पण उतरल्या. आणखी दोन चार बायकाही त्यांच्याबरोबर गेल्या. झंप्यानं डोकं लढवून शेजारच्या बिल्डिंगच्या गुरख्याला बरोबर घेतलं. सारी पलटण निमामावशीच्या दारात पोहोचली, तेव्हा निमामावशी तांदूळ मोजून घेत होती. एवढ्या बायका एकदम आलेल्या बघून तांदूळवाली चमकली. माप तिथंच टाकून तिनं हळूच सटकण्याचा प्रयत्न केला. पण दारातच झंप्या सावधपणानं उभा होता. त्यानं त्या बाईच्या कमरेला करकचून मिठी मारली. गुरख्यानं त्या काळगेल्या माणसाला आधीच घट्ट पकडून ठेवलं होतं. सगळ्या बायकांनी त्या तांदूळवालीची चांगलीच खरड काढली. गुरख्यानं त्या माणसाला चार लाफा मारल्याबरोबर तो गयावया करायला लागला. आणि फसवून जास्तीचे घेतलेले पैसे त्या दोघांनी मुकाट्यानं परत दिले.

निमामावशीकडून कडक चहा पिऊन आई खुषीत परत आली, तेव्हा

झंप्या घुंघट मारून झोपला होता. आईला आठवले आजी म्हणत होत्या, ‘ भारी हुशार हो तुमचा झंप्या ! त्यानं प्रसंगावधान राखलं म्हणून आजचं संकट टळलं. ’

झंप्या फाटकन् म्हणाला, ‘ आमची आई मला वेडाच म्हणते. काही नका कौतुक करू माझं.’ झंप्या आईवर जाम रागावला होता. पण आई मोठी शहाणी. तिनं हळूच झंप्याच्या केसातून हात फिरवला आणि म्हणाली, ‘ झंप्या रे, तुझ्यासाठी की नाही आज श्रीखंडाच्या वड्या करणाराय. शहाणं गऽबाई माझं पोर ! ’ हे ऐकून झंप्या टुणकन् अंथरुणावरून उठला आणि आईच्या गळ्यात पडून म्हणाला, ‘ आई ग, मी रोज रोज तांदूळवाली पकडून आणेन. मग तू रोज श्रीखंडाच्या वड्या करशील ना ? ’ त्यावर सगळ्या बायका खो खो हसत सुटल्या, आणि झंप्या मात्र वेडपटासारखा पाहातच राहिला !

• • •

## २ : झंप्याने धडा शिकवला

झंप्या, होता एवढासाच. पण महा खोडकर. महा बिलंदर. त्याचा अवतार पण मोठा मजेशीर होता. नाक एवढंसं नकटं, त्यावर टकाटका बघणारे टपोरे डोळे. त्या डोळ्यांत गमतीदार चमक होती. झंप्याचं डोकं एवढं गरगरीत होतं की त्या डोक्यात काय काय चाललं असेल याची कल्पनाच करावी ! ते गुणी बाळ सदोदित काहीतरी उचापती करत असायचं.

एकदा काय झालं, होळी आली होती जवळ. झंप्या मित्रांना घेऊन वर्गणी जमवत होता. सगळ्यात शेवटी तो शेंडेकाकूंच्या घरी गेला. काकू होत्या पैशाला चिकट आणि बोलण्यात तिखट. म्हणतात कशा, ‘ काय रे झंप्या, तुम्हाला काही धंदे नाहीत वाटतं ? पैसे कसले जमवता ? काही एक देत नाही जा. ’ झंप्या अदबीनं म्हणाला, ‘ काकू, आम्ही तुम्हाला प्रसाद देऊ ना. आणि की नाही आपल्या गल्लीची मोठी होळी करायचीय ’– झंप्याला पुढे बोलू न देता काकू डाफरल्या, ‘ मोठे आलेत होळी करणारे ! चला व्हा चालते. ’

झंप्याचं नकटं नाक रागानं लाल लाल झालं. तो बाहेर आल्या आल्या गरजला. ‘ काकू ढाकू ! या झंप्याचा अपमान करतेस काय ? पाहून घेऊ ’

त्यानंतर पुढच्याच महिन्यात काकूंनी आंब्याची साटं करायला घेतली. बाहेर उन्हात साटं वाळत घातली. झंप्याचा डोळा होताच. त्यानं

मित्रांना बोलावलं आणि सांगितलं, 'अरे ही ढाकू दुपारची ढाराढूर झोपते. तेव्हा आपण सगळं फस्त करू या.'

झालं! भर दुपारची वेळ. सगळीकडं सामसूम झालं. बायका निवडणं-टिपणं करत पुढील दारी बसल्या. झंप्याच्या घरी पापड होते. शेजार-पाजारच्या बायका पापड लाटता लाटता गप्पात रंगल्या. काकू मधल्या खोलीत चटई टाकून जरा वाऱ्याशी झोपल्या. झंप्यानं हळूच मित्र-मंडळींना खूण केली. हा हा म्हणता ताटं चाळीच्या मागच्या बाजूला पळविली गेली. साटांचा फडशा पाडून ताटं चाटून पुसून लखलखीत झाली. पुन्हा होती त्या जागी आणून ठेवली. तीन-साडेतीन वाजता काकूंना जाग आली. डोळ्यांवर पाणी मारत त्या मागच्या दारी आल्या. पाहतात तर काय, ताटं साफ. काकूंनी आरडा-ओरडा करून अख्खी चाळ डोक्यावर घेतली. त्यात झंप्याचाही उद्धार केला. तेव्हा झंप्याची आई घाईघाईत बाहेर आली. झंप्या मात्र शहाण्यासारखा चित्रांची पुस्तकं पाहत बसला होता. झंप्याची आई तेव्हा गप्प बसली. पण रात्री तिनं देवापुढे निरंजन लावलं, तेव्हा झंप्याला हाक मारली आणि म्हणाली, 'झंप्या, खरं सांग, तू काकूंचं साट चोरून खाल्लंस?' झंप्या बोलेना. तोंड मिटून गप्प उभा राहिला. आई रागानं ओरडली, 'अरे होय की नाही बोल ना.'

तशी झंप्या मुसमुसत म्हणाला, 'मी खरं बोललो तर तू मार देशील. आणि खोटं बोललो तर देव पाप देईल. मग मी करू तरी काय? सांग!'

'अरे मेल्या, म्हणजे चोरून खाल्लंस ना?'

'मग त्या ढाकूनं आमची वर्गणी का नाही दिली होळीची? आई, 'जशास तसं' या न्यायानं ठोशास ठोसा देणं हे मराठ्यांचं ब्रीद आहे.' बघ, या पुस्तकातच लिहिलंय. मी कुठं चोरी केली? मग शिवाजी महाराज पण चोर होते काय? ते नव्हते का शत्रूला शिक्षा करत?'

'अरे मूर्खा, ते राजे होते. थोर पुरुष होते.'

'मग मी पण थोर पुरुष होईन. पण तू आम्हाला थोर कुठं होऊ देतेस? जिजाबाई काय शिवाजी महाराजांचा गालगुच्चा घेत होती काय?'

'बाई, बाई ! महा वांड पोर झालंय हे. एक शब्द बोलले की दहा गोष्टी ऐकवतो. झंप्या, मी तुला स्वच्छ सांगते, हे असलं वागणं मला पसंत नाही. तू पुन्हा कुणाचं काही घेणार नाहीस असं कबूल कर. चोरून खाणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे. देवापुढे नमस्कार कर. सांग, पुन्हा असं करणार नाही म्हणून.

झंप्यानं रडत रडत कबूल केलं. पण या प्रकारामुळं झंप्या फारच गप्प गप्प बसू लागला. 'आई सांगते ते खरं असेल का ? आई कधीच खोटं सांगत नाही. मग वाईट वागणाऱ्यांना शिक्षा कोण करतो ?' झंप्या विचारात पडला.

शाळा सुरू झाली. झंप्याचा एक गट होता. ती सगळीच मुलं चांगली होती. अभ्यास, खेळ, खाऊ यात रमलेली असायची. कधी कुणाच्या अध्यात-मध्यात नसायची. त्याच वर्गात दुसरा एक बग्याचा गट होता. ती सगळी मुलं टगी होती. महा उनाड. प्रत्येकाची खोडी काढायची. लहान मुलांना रडवायची. झंप्याचं आणि त्या मुलांचं मुळीच पटायचं नाही. पण झंप्या त्यांच्याशी बोलायलाच जात नसे. तो मनात मात्र विचार करायचा, या मुलांना कोण शिक्षा करतो ? हा बग्या किती वाईट आहे ? मुलांची खोडी काढतो. मास्तरांची टर उडवतो. म्हाताऱ्या माणसांना त्रास देतो. याला देव का नाही शिक्षा देत ?' शेवटी एका शनिवारी झंप्यानं मारुतीला सांगितलं, 'हे मारुतिराया, त्या बग्याकडे जरा लक्ष दे. त्याला शिक्षा कर. तो फार वाईट आहे.'

मारुतीनं काहीच उत्तर दिलं नाही. पण झंप्या काही तिथून जायला तयार होईना. शेवटी संध्याकाळी भटजी आले. त्यांनी विचारलं, 'ए मुला, तुला काय पाहिजे ?'

झंप्या गंभीरपणे म्हणाला, 'मी देवाला कौल लावलाय. माझं काम होईल का ?'

झंप्याचं नकटं नाक, मोठे डोळे आणि गंभीर चेहरा बघून भटजींना हसू आलं. ते म्हणाले, 'अरे, तुझं काम होईल. हा बघ की देवानं कौल दिलाय.'

झंप्यानं विचारलं, 'पण माझं काम कोण करेल हो ?'

'अरे, आपलं काम आपणच करायचं हो. जा आता घरी. हा घे प्रसाद.'

झंप्या प्रसाद घेऊन बाहेर पडला. 'आपलं काम आपणच करायचं म्हणजे ?' झंप्याच्या डोक्यात विचाराचं चक्र फिरू लागलं. माझं काम मीच करायचं, म्हणजे मीच बग्याला शिक्षा द्यायची. मीच मारुती होणार. 'जय बलभीम की जय.' झंप्या घराकडे धावत सुटला. वाटेतच त्याला दोनचार मुलं रडत येताना भेटली. आता झंप्याच्या अंगात मारुतिराय संचारला होता. त्यानं मनातल्या मनात देवाला नमस्कार केला. आणि पुढे होऊन पाहिलं, तर काय ! अरे हा तर शेजारचा अप्पू आणि गोपू. झंप्या धावत त्यांच्याजवळ गेला आणि म्हणाला, 'काय झालं रे गोपू ?' त्यानं गोपूचे डोळे पुसत विचारलं.


गोपू रडत रडत म्हणाला, 'झंप्या रे, तो बाजूच्या चाळीतला बग्या आहे ना, त्यानं माझी पाटी फोडली. आणि अप्पूच्या डब्यातला शिरा खाऊन टाकला.'

अप्पूनं जोरात गळा काढला. झंप्या एकदम रागानं गरजला, 'काय म्हणालास ? बग्यानं शिरा खाल्ला ? लोकांचं चोरून खाणं हे पाप आहे. त्याला शिक्षा झालीच पाहिजे. हा मर्द मराठा झंप्या इथं उभा आहे. अरे रडता काय ? चला, त्या बग्याची खांडोळी करून टाकूया.'

झंप्याच्या डोळ्यांपुढं 'गड आला पण सिंह गेला' ही गोष्ट दिसत होती. त्याच्या अंगात साक्षात तानाजी संचारला होता. त्यानं आपले मित्र बरोबर घेतले आणि सगळे ओरडत ओरडत बग्याच्या चाळीकडं गेले. झंप्या एकदम वाटेतच थांबला, म्हणाला, 'ए, वेडपटांनो, एकदम गप्प बसा. असा आरडा-ओरडा केलात, तर मोठ्या माणसांना कळेल की ! आणि बग्या आपल्या हाती सापडणार नाही. आपण सगळे त्यांच्या चाळीच्या खाली पिंपं ठेवली आहेत, तिथं लपून बसूया. आणि हे बघ टप्पू, तू ही बोरं घेऊन बग्याच्या घरी जा. त्याला खूण करून हळूच बाहेर बोलाव. बग्याला घेऊन खाली ये. आम्ही इथं टपून बसतो. आणि मग त्याला असा मार देऊ की यंव.'

बग्याला घेऊन टप्पू खाली आला. बग्या बेसावध होता. तशी झंप्यानं

सगळ्या सवंगड्यांसकट त्याच्यावर चाल केली. सगळ्यांनी मिळून त्याला बुकलून काढला. बग्या दातओठ चावत होता. पण करणार काय ? शेवटी बग्याला खाली पाडून झंप्या त्याच्या उरावर बसला. आणि म्हणाला,



बग्याची रग अशा रीतीने झंप्याने जिरवली.

'बोल, पुन्हा लहान मुलांची खोडी काढशील ? त्यांचा डबा चोरून खाशील ?'

'नाही '—बग्या रडत म्हणाला.

'त्यांची पुस्तकं चोरशील ? पाटी फोडशील ?'

'नाही, नाही '—बग्या पुन्हा ओरडला.

'त्यांना ओचकारशील ? भुताची भीती दाखवशील ?'

'नाही नाही नाही....' बग्यानं आता मोठ्ठा गळा काढला. एवढ्यात गर्दी बाजूला करत कुणीतरी गृहस्थ पुढे आले. त्यांनी झंप्याचं बखोट धरून त्याला बाजूला केलं. बग्याला उठवला. बग्या रडत रडत म्हणाला,

'हा मुलगा मवाली आहे. हा मला मारतो.' झंप्या घाईघाईनं म्हणाला, 'अहो दादा, हा खोटारडा आहे. हा लहान मुलांची खोडी काढतो. 'भूत' म्हणून त्यांना भीती दाखवतो. त्यांचा डबा खाऊन टाकतो. म्हणून आम्ही याला शिक्षा केली.'

ते गृहस्थ हसले. खरं तर झंप्याकडे बघूनच त्यांना हसू येत होतं. पुन्हा झंप्याचं धीट बोलणं ऐकून त्यांना मौज वाटली. ते म्हणाले, 'असं वागणं वाईटच. पण तुम्ही मारामारी करायची नाही. मोठ्या माणसांना सांगायचं.'

तेव्हा गोप्या म्हणाला, 'ह्याची आई आम्हांलाच ओरडते.'

अप्पू म्हणाला, 'हा माझा शिरा खातो.'

टप्पू म्हणाला, 'हा माझी पुस्तकं फाडतो. भारी वाईट आहे बग्या.'

सगळी मुलं बग्याच्या नावानं ओरडू लागली. त्या गृहस्थांनी बग्याला घरी जायला सांगितलं. आणि झंप्याला जवळ घेत म्हणाले, 'व्हेरी स्मार्ट बॉय्.'

झंप्या हसून म्हणाला, 'आय् ॲम ए बॉय्.'

ते गृहस्थ मोठ्यानं हसले, म्हणाले, 'म्हणजे रे काय ?'

झंप्या म्हणाला, 'मला तेवढंच इंग्रजी येतं दादा. तुम्ही काय म्हणालात ते कळलंच नाही.' तेव्हा त्या दादांनी झंप्याला शाबासकी दिली आणि म्हणाले, 'अरे, मीं तुला चुणचुणीत मुलगा म्हणालो. तू खरंच हुशार आहेस. नाव काय तुझं ?'

'आय् ॲम झंप्या.' झंप्या ऐटीत म्हणाला, 'हे बरोबर आहे ना हो इंग्रजी ?'

त्याबरोबर ते गृहस्थ म्हणाले, 'झंप्या द ग्रेट.' सारी मुलं ओरडली, 'झंप्या द ग्रेट.'

मग ती मुलांची सेना ओरडत ओरडत घराशी आली. झंप्याची आई धावतच बाहेर आली. 'काय झालं रे झंप्या ?' तिनं विचारलं. मुलांनी सगळी हकीकत सांगितली, मुलं ओरडतच होती,

'झंप्या द ग्रेट, झिंदाबाद.'

आई मात्र काळजीत पडली, की हा झंप्या कुणाला मारून आलाय

कुणास ठाऊक ? ती कळवळून म्हणाली, ' झंप्या, अशी मारामारी करू नये रे. '

' अग पण आई तूच म्हणालीस ना, वाईट वागणाऱ्याला शिक्षा करायची म्हणून. '

' होय रे बाबा, पण तुला कुणी सांगितलं होतं शिक्षा कर म्हणून. नसती भांडणं घेऊन येतोस. '

झंप्याला आईचा भारी राग आला. आपण चांगलं वागलो तरी ही का रागावते हेच त्याला कळेना. तो फुरंगटून आतल्या खोलीत जाऊन बसला. आई मात्र विचार करायला लागली, कसं होणार माझ्या झंप्याचं ?

• • •

# ३. झंप्याची दिवाळी

दिवाळी जवळ आली. खेळ, खाऊ, फटाके–केवढी तरी मौज. मुलं रंगबेरंगी स्वप्नं बघत होती. अप्पूला त्याची आई मस्तपैकी 'जिन्स' घेणार होती. टप्पू झकास 'बाजा' घेणार होता. गोपूनं आत्ताच 'ढोल' आणून ठेवला होता. दिवाळीची सुट्टी वाजत गाजत पार पडणार होती.

झंप्याच्या घरी देखील फराळाचे खमंग वास येत होते. झंप्याला 'नेहरू शर्ट आणि सुरवार' शिवायला टाकली होती. पण तरीदेखील झंप्या खुषीत नव्हता. काल शेजारच्या चाळीतला राजू त्याला भेटला होता. झंप्यानं राजूला विचारलं, 'राजू तू रे काय घेणार ?

राजू एवढंसं तोंड करून म्हणाला, 'मी काहीच घेणार नाही.

'का रे ?'

'दिवाळीनंतर की नै ताईची एस्. एस्. सी ची फी भरायची आहे. आई म्हणाली, ताई मिळवायला लागली की मग आपण दिवाळी करू हं.'

'म्हणजे ? ताई मिळवेपर्यंत तू दिवाळी करणारच नाहीस ?'

'अं हं.' राजूनं मान हलवली. आणि त्याला एकदम रडूच फुटलं. तो रडत रडत म्हणाला, 'माझ्या आईकडे पुष्कळ पैसे नाहीत रे. आणि आमचे बाबा देवबाप्पाकडे गेलेत, आता ताई मोठी झाली की तो आणेल पैसे–'

हे ऐकन झंप्याला भारी वाईट वाटलं. आपण सगळे दिवाळी करणार. छान छान कपडे घालणार खमंग खाऊ खाणार आणि राजू मात्र

रडत बसणार ? ह्या: ! हे काही बरं नाही. राजूची पण दिवाळी झालीच पाहिजे. रात्री झंप्यानं आईला विचारलं,

'आई ग, आपण राजूसाठी शर्ट-चड्डी घेऊ या का ग विकत ?'

झंप्याची आई म्हणाली, 'वेडाच आहेस. अरे, त्याच्यासाठी त्याची आई घेईल.'

'पण त्याच्या आईजवळ पैसे नाहीत.'

'मग आपल्याकडे कुठे पैशाचं झाड लागलंय ?' झंपूची आई रागानं म्हणाली.

झंपू एकदम गप्प बसला. मग जराशानं तो म्हणाला, 'आई ग, माझा नेहरू सदरा आहे ना, तो राजूला देऊन टाकू का ? मला नको दुसरा.'

आपल्या मुलाच्या डोक्यात काय चाललंय हे झंपूच्या आईच्या लक्षात आलं. ती प्रेमानं म्हणाली, हे बघ झंप्या, असं की नै नेऊन दिलं तर राजूच्या आईला फार वाईट वाटेल. अरे, स्वाभिमानी माणसांना लोकांचं घ्यायला आवडत नाही.'

झंप्या आता मात्र विचारात पडला. मग डोकं खाजवत म्हणाला, 'लोकांचं घ्यायला आवडत नाही आणि आपल्याजवळ तर पैसे नाहीत. मग करायचं तरी काय ?'

'पैसे मिळवायचे आणि मग घ्यायचं.'

झंप्याच्या आईनं मार्ग सुचवला.

पैसे मिळवायचे— कसे ? कसे ? झंप्या जोरजोरात डोकं हलवून विचार करू लागला. सकाळीच घराची कडी वाजली. झंप्यानं दार उघडलं. दारात कुणीतरी परका माणूस उभा होता. झंप्यानं विचारलं, 'कोण हवंय हो ?' ते गृहस्थ म्हणाले, 'तुझी आई आहे का बाळ घरात ? दिवाळीसाठी मी अत्तरं, भेटकार्ड विकतो.'

झंप्यानं उत्सुकतेनं विचारलं, 'काय हो काका, तुम्ही हे का विकता ?' झंप्याचा प्रश्न ऐकून त्या गृहस्थांना हसू आलं. ते समजावणीच्या स्वरात म्हणाले, 'अरे लोकांना घरबसल्या वस्तू मिळतात आणि आम्हाला पैसा मिळतो.'

'अस्सं. तुम्ही गरीब आहात का हो? तुमच्याही घरी दिवाळी होणार नाही म्हणून पैसे मिळवता?' झंप्याचा प्रश्न ऐकून ते गृहस्थ भांबावले. हा मुलगा हुषार आहे की वेडपट आहे हेच त्यांना कळेना. अधिक न बोलता ते चट्कन पुढच्या घरी गेले. झंप्या मात्र तिथंच विचार करत बसला. आपण पण अशा वस्तू विकून पैसे मिळविले तर? पण काय बरं विकायचं?

आपल्याला कोण वस्तू आणून देईल?

आपल्याकडून कोण घेईल? आणि मग एकदम झंप्याच्या डोक्यात वीज चमकली.

हां रे हां! असंच करावं. ठरलं म्हणजे ठरलं. झंप्या टाण् टाण् उड्या मारत धावत निघाला. तो थेट संजूदादाच्या दारात जाऊन उभा राहिला. संजूदादा झंप्याला भारी आवडायचा. तो मुलांचे खूप लाड करायचा. अभ्यासातही तो हुषार होता. सारी मुलं त्याला 'हिरो' म्हणायची. झंप्या संजूदादाच्या दारात जाऊन उभा राहिला. संजूदादा आकाशकंदील करत होता. झंप्याला पाहून त्यानं विचारलं, 'ए हे! झंप्या द ग्रेट, क्या चाहिए?'

झंप्या एक मिनीट गप्प उभा राहिला. मग म्हणाला, 'संजूदादा, लोक अत्तरं आणि भेटकार्डं विकतात ना रे?'

'हो. का बरं?'

'मग पणत्या, रांगोळी, हे पण विकता येईल?'

'हो. येईल की. का रे बाबा, तू विकणार आहेस की काय?'

'हसू नको संजूदादा, पण की नै शेजारच्या चाळीतला राजू आहे ना. तो दिवाळीच करणार नाही आहे–' असं म्हणून झंप्यानं राजूची सगळी हकीगत संजूदादाला सांगितली. आणि पणत्या व रांगोळी विकून आपण पैसे मिळवूया असंही सांगितलं. ते पैसे त्याला राजूला द्यायचे होते.

झंप्याचं बोलणं संजूदादानं शांतपणानं ऐकून घेतलं आणि मग थोडा विचार करून तो म्हणाला, 'हे बघ झंप्या, असे पैसे कोणी घेणार नाही. आपण असं करू या– मी एक नोटीस तयार करतो. त्यात तुम्ही लहान मुलं रांगोळी, उटणं आणि पणत्या विकणार आहात असं लिहितो. या

चारी–पाची चाळींत ती नोटीस घेऊन तुम्ही हिंडायचं. तू आणि राजूनी बरं का ? आणि मग लोक ऑर्डर लिहून देतील. मी सामान आणून देईन. तुम्ही मात्र ते पिशवीत घेऊन नीट घरोघर पोचवायचं. खूप फेऱ्या मारायला लागतील दोस्त. आहे तयारी ?'

'येस् तयारी !' झंप्या ओरडला. 'मी आत्ताच राजूला घेऊन येतो.' असं म्हणून झंप्या खाली धावला. पण तो आधी राजूकडे गेलाच नाही. त्यानं आपले पाच-सात दोस्त जमविले. सगळयांना ठरलेलं सगळं सांगितलं आणि मग एकदम गंभीर होऊन झंप्या म्हणाला, 'काय रे, हे बरं का ? राजू मात्र रडत बसणार. आपण मात्र गंमत करणार. आपल्याला नाही आवडणार असं. आपण सगळे मिळून गंमत करू. सगळे मिळून दिवाळी करू.'

'हो हो! सगळे मिळून दिवाळी करू.' मुलं ओरडली. मग काय विचारता ! दुसरे दिवशीच तो सगळा बालचमू कामाला निघाला. दोन दोन मुलांनी एक एक चाळ वाटून घेतली. दोन तासांत सबंध गल्लीतल्या चाळी पालथ्या घातल्या. मुलांची ही धडपड बघून मोठयांनाही कौतुक वाटलं. सर्वांनी भराभर ऑर्डर्स दिल्या. मग काय विचारता, पोरांची फौज कामाला जुंपली. रांगोळीच्या पुडया, उटण्याची पाकिटं, पणत्यांची चवड यांनी पिशव्या भरल्या. मुलं न दमता जिने चढत होती. उतरत होती. लोक नीट मोजून पैसे देत होते. 'जपून न्या रे.' म्हणून इशारा देत होते.

दिवाळीच्या आदले दिवशी सगळी मुलं सुटया पैशांची चवडच्या चवड घेऊन संजूदादाकडे जमली. त्या सगळया सुटया पैशांच्या नोटा करून संजूदादानं एका पाकिटात घातल्या. पैशाचा हिशेब मुलांना नीट समजून दिला, आणि नोटांचं पाकिट झंप्याच्या स्वाधीन केलं. 'नीट जपून ने हं ! की मी येऊ सोबत ?' संजूदादानं विचारलं.

झंप्या नसलेल्या मिशांवर पीळ देत म्हणाला, 'हं, तू काय आम्हाला एवढा बावळट समजतोस ? इथून सरळ सुटणार की राजूच्या घरी पोचणार.' संजूदादा हसला. पैशाचं पाकीट घेऊन झंप्या आणि मंडळी निघाली. त्यांच्या जोरजोरात गप्पा चालल्या होत्या.

'एवढ्या पैशात काय काय येईल रे ?'

'टेरिकॉटचा शर्ट आणि पॅन्ट येईल नै ?'

'बावळटमामा आहेस रे.' झंप्या म्हणाला, 'अरे, ती गरीब माणसं आहेत. ते लोक काय टेरिकॉटचे कपडे घेणार ? राजूची आई फराळाचं करेल. आपण दिलेल्या पणत्या लावेल. आणि राजूला साधे कपडे घेईल.'

अप्पूनं उत्सुकतेनं विचारलं, 'किती, ११० रुपये जमलेत ना रे ?'

झंप्या रागानं म्हणाला, 'संजूदादानी काय सांगितलंय् ? रस्त्यात पैशाबद्दल बोलायचं नाही. पाकीट घट्ट पकडायचं आणि राजूच्या आईच्या हातात नेऊन द्यायचं.'

हे बोलणं चाललेलं असताना मुलं राजूच्या घराजवळ आली होती. त्यांच्या चाळीचं गेट ओलांडून आत जाणार, एवढ्यात कुणीतरी झंप्याला जोरात धक्का दिला. झंप्या त्या धक्क्यानं कोलमडला. स्वतःला सावरून नीट उभा राहीपर्यंत त्याच्या लक्षात आलं, की धक्का देणाऱ्या माणसानं आपलं पाकीट अलगद उडवलंय. झंप्या जोरात ओरडला. 'अरे, चोर, तो बघ, तो !'

तो माणूस तोंड फिरवून उलट दिशेला चालला होता. तेवढ्यात झंप्यानं आणि त्याच्या मित्रांनी 'पकडा, धावा धावा'ची बोंबाबोंब केली. चार दिशेनं माणसं धावत आली. पण तो धावणारा महाबिलंदर होता. पाहाता पाहाता तो गल्लीबोळातून झोपड्यांत शिरला. झंप्या तेवढ्याच वेगानं धावत होता. तो चोर धावत समोरच्या झोपडीत शिरला आणि दिसेनासा झाला झंप्या बाजूच्या झोपडीतून वेगानं त्याच्या मागोमाग गेला. आणि त्याच्या लक्षात आलं, की तो चोर समोरच्या खाडीत शिरलाय. झंप्या तसाच मागे धावत आला. तेवढ्यात इतरही बरेच लोक जमले होते. झोपडीतले लोक त्यांना आत येऊ देईनात. 'इथं कुणी चोर नाही. आमच्या घरात शिरायचं नाही.' असा त्यांचा आरडाओरडा सुरू झाला. झंप्यानं सांगितलं, 'तो चोर खाडीच्या पाण्यात शिरलाय. मी पाहिलं त्याला.' तेवढ्यात पोलीसही तिथे आला. सर्वजण खाडीच्या पाण्याशी गेले. आता नाही तरी आणखी दोन मिनिटांनी तो वर येईलच, याची सर्वांना खात्री होती. पण अर्धा तास लोटला

तरी चोराचा पत्ता नाही. पोलीस निघून गेला. जाता जाता तो म्हणाला, ‘अहो, हे भुरटे चोर महालबाड ! पाण्यात धोंडा फेकतील आणि आपण कुठंतरी पळतील. आता तो हाताशी लागतोय होय ? चला घरी मुकाट्यानं.’

माणसं परतली. पण झंप्या आणि त्याचे मित्र तिथंच उभे होते. संजूदादाही आरडाओरडा ऐकून आला होता. तो झंप्याची समजूत घालत म्हणाला, ‘चल आता घरी. पैसे तर गेले. आता काय करायचं?’

झंप्याच्या डोळ्यांत अश्रू उभे होते. पण तरीदेखील चिडक्या आवाजात तो म्हणाला, ‘मी येणार नाही. हे कष्टाचे पैसे आहेत. मिळालेच पाहिजेत.’ झंप्यानं मित्रांच्याबरोबर हळूहळू खाडीची दुसरी बाजू गाठली. चालता चालता तो विचार करत होता, चोर कुठं लपला असेल ? तो पाण्यात गेला नाही हे तर नक्कीच ! नाहीतर तो वर आला असता आणि झोपडीतून तो खाडीच्या दिशेला पळाला हे नक्की. ‘धप्प्’ असा आवाज दगडाचा झाला असेल. तर मग हा कुठे लपला असेल ? आणि जराशानं झंप्याच्या डोक्यात कल्पना आली. तिथं खाडीच्या कडेला बरेचसे पाण्याचे पाइप होते. त्या पाइपमधून झोपड्यातली माणसं रात्रीची झोपत असत. ते त्यांनी पाहिलं होतं. एकदा बाबांना विचारलंही होतं, ‘ही माणसं पायपात का हो झोपतात ?’

बाबा म्हणाले, ‘अरे, बिचाऱ्यांना झोपायला जागा नाही आणि पावसाळ्यात रस्त्यावर भिजण्यापेक्षा पायपात झोपणं बरं नाही का ?’ झंप्याला ते आठवलं. हा माणूस त्या पायपात तर लपला नसेल ? त्यानं संजूदादाला आपली कल्पना सांगितली. संजूदादाही विचारात पडला. म्हणाला, ‘तू म्हणतोस ते शक्य आहे झंप्या. पण तो एवढा वेळ पायपात राहाणार नाही. आपण खाडीत शोधत होतो तेवढ्यात तो इथून सटकला असेल.’

‘अरे, पण सटकणार कुठं ? रस्त्यावरच्यासारखं त्याला जोरात तर धावता येणार नाही. तो हळूहळू त्या शेवटच्या पायपापर्यंत पोचला असेल. चल, चल लवकर.’ संजूदादाचा हात धरून झंप्या धावत सुटला. बाकीची मुलंही त्यांच्या मागून धावली. टाण् टाण् उड्या मारत

मुलं चालली होती. झंप्या आणि संजूदादा रस्त्यावरचे दगडधोंडे ओलांडत रेसच्या घोड्यासारखे धावत होते.

पाइप संपले तिथं थोडीशी झाडी होती. बाजूला एक मोडकी झोपडी होती. त्यात पाच-सात कसली तरी पिंपं पडलेली होती. झंप्या घाईघाईत पिंपाशी गेला. उड्या मारून तो पिंपात डोकावत होता आणि तो एकदम मोठ्यानं ओरडला, ' अलीबाबा आणि चाळीस चोर–'

आतला माणूस पिंपातून उडी मारणार एवढ्यात संजूदादा तिथं आला. त्यानं त्याची मानगूट पकडून त्याला जोरात खाली आपटलं. बाकीची मुलंही तिथं पोचली. सर्वजण त्याला बुकलून बुकलून खाली ढकलत होते. तोंडांनी मोठमोठ्यानं ओरडतही होते.



झंप्यानं संजूदादाच्या मदतीनं चोराला बुकलून काढलं.

मुलांचा गलका ऐकून मोठी माणसं धावत आली. परतलेली माणसं आणि पोलीसही आला. पोलिसानं चोराला ताब्यात घेतलं. हातकड्या घालून त्याची मिरवणूक पोलीस स्टेशनवर गेली. इकडं त्या पिंपात झंप्याचं पाकीट पडलं होतं. चोरानं ते हळूच तिथं टाकलं होतं. झंप्यानं ते पाकीट उचललं. पोलिसाच्या मागे जाण्यापेक्षा आपण हळूच सटकावं म्हणून संजूदादाला घेऊन ती सगळी मुलं झोपडीच्या मागच्या बाजूला आली. त्या चोराबरोबर इतर बरीच माणसं होती. तो आता खरपूस मार खाईल. पाकीट सापडलं नाही की पोलीस त्याला सोडून देतील. मग तो पुन्हा लपत छपत पाकीट घ्यायला या पिंपाशी येईल, हे संजूदादाला माहीत होतं. त्यांनी ते पिंप उलटं करून ठेवलं आणि त्याच्यावर खडूनं लिहिलं—

'चोरा चोरा हुप्
तुला घालतो धूप्.'

आणि हसत हसत सगळे बाहेर पडले. झंप्याला भलताच आनंद झाला होता. पैसे परत मिळाल्याचा तो आनंद होताच, पण आपण चोराला पकडलं याचा अभिमानही वाटत होता. मुलं एवढ्या आनंदात चालली होती की जशी त्यांची दिवाळी आत्ताच साजरी होत होती. ती नाचत होती, गात होती, उड्या मारत होती. संजूदादानं इशारा दिला, 'जपून हं.' झंप्या म्हणाला, 'डरो मत यार! झंप्या द ग्रेट आहे ना इथं.'

मुलं राजूच्या चाळीत शिरली. झंप्या दोन-दोन पायऱ्या ओलांडत वरच्या मजल्यावर पोचला. गडबड ऐकून चाळीतली माणसं गॅलरीत उभी होतीच. राजूची आई दरवाजातच होती. तिनं विचारलं, 'काय झालं रे?'

'अलीबाबा चाळीस चोर!' झंप्या ओरडला आणि त्यानं पैशाचं पाकीट राजूच्या आईच्या हातात दिलं.

राजूची आई आश्चर्यानं म्हणाली, 'एवढे रे कसले पैसे?'

'ते राजूनं कमावले आहेत.' आणि मग राजूच्या आईला झंप्यानं पहिल्यापासूनची सगळी हकीगत सांगितली. ती ऐकता ऐकता राजूच्या आईच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. झंप्या बावरला. कळवळून म्हणाला,

‘ राजूची आई, तुम्ही रडता कशाला ? तुम्हाला वाईट वाटलं का हो ? तुम्ही खरंच घ्या हे पैसे. हे राजूचे आहेत. हे तुम्ही घेतले नाहीत तर मला रडू येईल–’ बोलता बोलता झंप्याचा गळा दाटून आला. पैसे तिथेच ठेवून तो मागच्या मागे सटकला. संध्याकाळी राजू उड्या मारत खरेदीला निघालेला बघितला आणि झंप्या आनंदानं ओरडलाच, ‘ आता मज्जा. राजू नवे कपडे आणेल. आपली दिवाळी होईल, राजूची पण दिवाळी होईल. ’ मुलांनी आनंदानं टाळ्या वाजविल्या आणि टाळ्या वाजवता वाजवता झंप्या मात्र सदऱ्याला नाक पुसू लागला. आनंदानं त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते.

• • •

## ४ : झंप्या सातासमुद्रापार........

वार्षिक परीक्षा आटोपल्या. रिझल्ट लागला. मे महिन्याची सुट्टी पडली. मुलांच्या गमती–जमतीच्या योजना सुरू झाल्या. कुणी पोहायला जायचं ठरवलं होतं. कुणी मांज्याला काच लावून ठेवली होती. मस्त पतंग उडवायचं ठरलं होतं. गंपूनं क्रिकेटचा सेट आणला होता. हेऽऽ टोल्यावर टोले मारून सर्वांना जेरीला आणायची तयारी केली होती. झंप्या मात्र गप्प होता. भोवरा, विटी-दांडू, पत्ते, गोट्या सगळं त्यानं ट्रंकेत भरून ठेवलं होतं. गोपूनं विचारलं, 'तू जाताना ट्रंक नेणार नाहीस ?'

चंदूनं विचारलं, 'गोट्या नेणार नाहीस ?'

अप्पूनं विचारलं, 'लगोरी नेणार नाहीस ?'

'नाही, नाही, नाही !' झंप्यानं जोरात मान हलवली.

'अरे, मग तू करणार तरी काय ?'

सर्वांनी आश्चर्यानं विचारलं.

'मी ?' झंप्यानं एक मोठ्ठा श्वास घेतला. त्याचे डोळे लुकलुकले. अगदी खालच्या आवाजात तो म्हणाला, 'अरे, मी सात समुद्रापलीकडचा राजा शोधायला जाणार आहे.'

'सात समुद्रापलीकडचा ? ब् ब् !' सगळे त्याच्याकडं आश्चर्यानं बघायला लागले. अप्पू तर आश्चर्यानं अंगठाच चोखायला लागला. झंप्या ओरडला,

'अप्प्या, तोंडातून अंगठा काढ. खुळपं कुठलं ! कसं वागावं ते पण

कळत नाही. अरे, असा बावळटपणा केलास तर सात समुद्रापलीकडचा राजा दिसेल का ? मी की नै मुरूडला जाणार आहे. तिथं जंजिऱ्याचा हाऽऽ भला मोठ्ठा किल्ला आहे. आणि किल्ला पाण्यात आहे; माहिताय् ? अरे, चारीकडे पाणी. एवढ्या मोठ्या लाटा, आणि मधोमध हा ऽऽ मोठा किल्ला! त्याच्या आतमध्ये आरसेमहाल आहे म्हणे. त्या आरशात पाहिलं की सात समुद्रापलीकडचा राजा दिसतो.'

'कसा असेल रे तो राजा ? सोन्याचे कपडे असतील नै त्याचे ?'

'हट्! बावळटच आहेस. राजा काय सोन्याचे कपडे घालतो ? राणी आणि राजकुमार सोन्याचे कपडे घालतात. आणि राजा मस्त लोखंडाचे कपडे घालतो. खाण् खाण् !' झंप्यानं माहिती पुरवली.

'अरे, आमच्या घरी लोखंडाची कॉट आहे. मग त्या कॉटचा सदरा घालत असेल का रे तुझा राजा ?'

'चंद्या, तू अगदी बावळटच आहेस हं ! तो राजा की नै लोखंडाचा जिरेटोप घालतो. आणि लोखंडाचा कोट घालतो. आणि हातात चमकती तलवार घेऊन ढिशांव, ढिशांव करून शत्रूच्या पोटात खुपसतो. लढाई संपली की तो जहाजात जाऊन बसतो आणि मासे मारतो.' एवढे बोलून झंप्या गप्प बसला. झंप्याच्या मित्रांना त्याच्याविषयी भयंकर आदर वाटू लागला. लोखंडाचा कोट घालणारा राजा, आरसे महाल, भलं मोठ्ठं जहाज... कितीतरी छान छान चित्रं मुलांच्या डोळ्यांपुढे उभी राहिली. कुणालाच विटी-दांडू खेळण्यात गंमत वाटेना. चेंडू, लगोरी तशीच कोपऱ्यात पडून राहिली.

दुसऱ्या दिवशी झंप्या प्रवासाला निघाला. झंप्याच्या आईची नजर चुकवून चंदूनं झंप्याला खूण केली. झंप्या त्याच्याजवळ गेला. चंदूनं हळूच विचारलं, 'झंप्या, तू आपला दोस्त. एवढ्यामोठ्या कामाला चाललास. माझ्यासाठी काय करशील ?'

'काय करू ?' झंप्यानं गंभीरपणानं विचारलं. चंदूनं आपल्या खिशातून एक पुडकं बाहेर काढलं. त्यात काचेचे दोन लोलक होते आणि काडेपेटीवरची दहा-बारा चित्रं होती. तो मौल्यवान खजिना

झंप्याच्या हाती देत चंदू गहिवरून म्हणाला, ‘झप्या, लोखंडाचा झगा घालणाऱ्या राजाला माझी ही भेट देशील ?’

‘देईन हो !’ झंप्यानं आश्वासन दिलं मग हळूहळू अप्पू आला, गम्पू आला, गोपू आला. प्रत्येकानं राजाला द्यायला छानशी भेट आणली होती. रंगीत चित्रं, रंगीबेरंगी खडू, काचांचे पारदर्शक तुकडे, स्क्रू-ड्रायव्हर अशा अनेक वस्तू झंप्याच्या हातात गोळा झाल्या. राजाला द्यायला त्या भेटवस्तू झंप्यानं जपून आपल्या कपड्याच्या बॅगेत ठेवल्या. झंप्याची टॅक्सी सुरू झाली आणि सगळ्या मुलांनी हात हलवून निरोप घेतला. त्यांचा दोस्त झंप्या राजाला भेटायला चालला होता.

झंप्या मुरूडच्या बंदरावर पोहोचला तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. किनाऱ्याचे दिवे लुकलुकत होते. झंप्याला वाटलं, ते आपलं स्वागत करताहेत. छोटी नाव पाणी कापत कापत पुढं चालली होती. किनाऱ्यावर बऱ्याच आकृत्या दिसत होत्या. पण अंधारामुळं चेहरे मात्र दिसत नव्हते. झंप्या डोळे फाडून फाडून आजूबाजूला पाहात होता. किनाऱ्यावरची झाडं एवढी प्रचंड वाटत होती की झंप्याच्या उरात धडकीच भरली. त्यांच्या झावळ्या आकाशाला पोहोचल्या होत्या. लुकलुकत्या दिव्याच्या उजेडात असं वाटायचं, की पंचवीस हात असलेला राक्षस आकाशातून शेंडी आपटत पुढं पुढं येतो आहे. त्याच्या पायातल्या सपाता सप् सप् आवाज करताहेत. झंप्याच्या पोटात ऊन ऊन झालं. हा कसला सप् सप् आवाज ? हा झाडांचा राक्षस पुढं पुढं तर येत नाही ? आणि असं जर असेल तर लोखंडाचे कपडे घातलेला राजा कसा असेल ? आपल्याला मट्दिशी खाऊन तर नाही टाकणार ? झंप्यानं डोळे गच्च मिटून घेतले. जोरजोरात देवाचं नाव घ्यायला सुरुवात केली—

‘काळभैरव दूर...दूर...दूर....’

एवढ्यात कुणाचासा बोलण्याचा आवाज आला. झंप्यानं हळूच एक डोळा किलकिला करून पाहिलं. बाबांचा हात घट्ट हातात पकडून त्यानं विचारलं, ‘बाबा, हा कसला हो आवाज ?’ ‘अरे, झंपूराव, तू घाबरलास की काय ? अरे, नावाडी पाण्यात वल्हं मारतोय ना, त्याचा हा आवाज.’

झंप्या लगेच सारखा बसत म्हणाला, ' काहीतरी काय बाबा ! मी घाबरलो का ? मी फक्त विचारलं आवाज कसला म्हणून ?' झंपूनं सताड डोळे उघडले. आसपास नीट न्याहाळून पाहिलं. नाव किनाऱ्याजवळ आली होती. एका हेलकाऱ्यानं झंपूला पाठंगुळी मारलं आणि पाण्यातून वाट काढत बाहेर काढलं. झंपूला भारी मजा वाटली. हा माणूस आपल्यासाठी राजानंच पाठवला असणार याची त्याला खात्री झाली. एवढ्यात हातात कंदील धरलेला एक माणूस विचारत आला, ' टांगा हवा काय शेट ?'

आता आपण टांग्यातून जाणार याचा झंप्याला फारच आनंद झाला. झंप्या टांग्यात जाऊन बसला. हलॅक् हलॅक्, छक् छक् छक् ! घोडे धावू लागले. खाड् खाड् कच् टांग्यानं मस्तपैकी उडी मारली. आई ' आय. ऊई ' करत ओरडत होती. झंप्याला मात्र फारच मौज वाटत होती. घोड्याबरोबर त्याचे विचारही धावत होते. तो एकदम बाबांना म्हणाला, ' बाबा, तो जंजिऱ्याचा किल्ला कुठाय हो ?'

' अरे तो काय तो ?'

' कुठे हो ?– तो ? तो लांब पाण्यात आहे तो ? मग तिथं पोहोचायचं कसं ?आणि बाबा तिथली माणसं पाण्यात बुडत नाहीत का ? ती काय पाण्यावर तरंगतात ?' त्यावर बाबा मोठ्यानं हसले. आईही हसायला लागली. झंप्या मात्र विचारात गढून गेला. ह्या एवढ्या पाण्यातून आपण जायचं कसं ? आणि तो राजा ? तो काय पाण्यातच राहातो ? मग तो आपल्याला भेटणार कसा ? झंप्यानं डोळे ताणून अंधारात पाहिलं. हत्तीएवढ्या लाटा पुढे पुढे येत होत्या. त्या लाटांच्या ढगाआड मध्येच किल्ला लपत होता, मध्येच दिसत होता. किल्ल्याचे काळेकुट्ट दगड झंप्याकडे थंड नजरेनं पाहात होते. त्यांच्याकडे पाहात असतानाच झंप्या आईच्या मांडीवर झोपी गेला.

o

झंप्याला पहाटे जाग आली ती खट् खट् आवाजानं. कसला हा आवाज ? कुठून बरं येत असेल ? त्यानं आसपास पाहिलं छे, कुठंच कुणी नव्हतं. नक्कीच हा आवाज आकाशातून येतोय. राजाचा रथ

खाली येत असावा. झंप्यानं घाईघाईत आपल्या मित्रांनी दिलेल्या भेट-वस्तू हातात घेतल्या आणि बाहेरच्या अंगणात धूम ठोकली. खट्, खट्, खट् ! पुन्हा तोच आवाज झंप्यानं वर पाहिलं. ओहो ! केवढी मस्त मजा. एक कुणीतरी शूर पुरुष त्या आकाशाएवढ्या उंच झाडावर चढून काहीतरी काढत होता. त्याच्या पाठीला ढालीसारखं काहीतरी बांधलं होतं, पण ती ढाल नव्हती. तो गडू होता. अमृत म्हणतात ते हेच असावं का ? झंप्याला वाटलं, त्या शूर राजपुत्राचा आपण जयजयकार करावा. पण असा काय हा राजपुत्र ? त्याच्या अंगात सदरासुद्धा नव्हता. एक एवढंसं फडकं धोतरासारखं कमरेभोवती आवळून गुंडाळलं होतं. त्याच्या कमरेला ही भली मोठी कोयती होती. झंप्याला ती कोयती फार आवडली. एव्हाना तो माणूस सर्सर्सर् खाली उतरला देखील. झंप्या घाईघाईत त्याच्या पुढे गेला आणि म्हणाला, 'हे शूर सैनिका, तुला माझं वंदन असो ! तुम्ही कोण आहात ? ह्या कोयतीनं तुम्ही वाघाला मारता का ?'

तो माणूस मोठ्यानं हसला. म्हणाला, 'रात्री भेट मी तुला वाघाचं पिल्लू दाखवतो.'

'तुमचं नाव काय ?'

'माझं नाव विठू भंडारी.'

भंडारी नजरेआड होईपर्यंत झंप्या त्याच्याकडे पाहात होता. भंडारी शूर शिपाई असला पाहिजे आणि तो राजाचा विश्वासू नोकर असला पाहिजे, याची झंप्याला खात्री पटली. आज रात्री भंडारी त्याला वाघाचं पिल्लू दाखवणार होता. झंप्या मनापासून खूष झाला. त्यानं आईबाबांना काहीही न सांगण्याचं ठरवलं. त्याची आई झुरळाला भीत होती. ती काय वाघाला जवळ घेणार थोडीच ? झंप्यानं ठरवून टाकलं, की रात्री भंडारीसाहेब भेटले की त्यांच्याकडून एक वाघाचं पिल्लू मागून घ्यायचं. मुंबईला जाताना ते हळूच बॅगेत घालून घेऊन जायचं. मुंबईला नेल्यावर त्याला मागच्या दारी बांधून ठेवायचं. रोज फिरायला न्यायचं. खाऊ-पिऊ घालून हे ऽ दांडगं करून टाकायचं आणि त्याचा मोठ्ठा बाघोबा झाला की गणिताच्या मास्तरांच्या अंगावर छू करायचा.

झंप्याचे सगळे बेत पक्के झाले होते. तो रात्रीची वाट बघत वेळ काढत होता.

रात्रीचे दहा वाजले आईचा केव्हाच डोळा लागला. बाबा पुस्तक वाचता वाचता घोरू लागले. झंप्यानं हळूच काढता पाय घेतला. तो मागच्या दारी गेला. किर्र किर्र रातकिडयांचा आवाज येत होता. सगळीकडे सामसूम होतं. सकाळचा भंडारीसाहेब कुठंच दिसत नव्हता. आता काय करावं ? झंप्याला काळजी पडली. जरा पुढे होऊन पाहावं का ? झंप्या एक एक पाऊल पुढे टाकत वाडीच्या टोकाशी आला. जिकडे तिकडे उंच उंच झाडं दिसत होती. मध्येच विहिरी, त्यांचे रहाट, पाण्याचे हौद, त्यांना जोडलेले पाट, त्याच्या पुढे पुन्हा झाडं. झंप्या झपाझप चालला होता. आपण किती चाललोय हेच त्याच्या लक्षात येत नव्हतं. पण एकदम चालता चालता तो थांबला. कुठेतरी माणसांची कुजबुज ऐकू आली. मध्येच बॅटरीचा प्रकाश दिसला. नक्कीच भंडारी-साहेब इथं असणार पण इथं तर चार-पाच आवाज ऐकू येत होते. अन् ते सुद्धा किती खालच्या पट्टीत. अरे बापरे, काही दगाफटका तर नसेल ? नक्कीच, नक्कीच हे शत्रूचे लोक असणार. बिचाऱ्या राजाला हे फसवणार तर नाहीत ? झंप्याच्या पोटात कालवाकालव झाली. तो हळूच एका झाडाआड लपला. तिथे खाली बसला. अंधारात काय दिसतं ते सावधपणे पाहू लागला.

हळूहळू तिथल्या पाऊलवाटेवर उजेड दिसू लागला. चार-पाच माणसं त्या उजेडाच्या दिशेनं निघाली. ती सरळ उजेड येत होता त्या घराशी जाऊन उभी राहिली. कुणीतरी दारावर टक्टक् केलं. दार उघडलं गेलं. एका बुरखाधारी माणसानं दार उघडून त्या लोकांना आत घेतलं. एका मिनिटात दरवाजा बंद झाला. सगळीकडे पुन्हा काळोख, दाट-दाट काळोख. झंप्याला रडायला यायला लागलं. आपण कुठे होतो ? कुठे आलो ? ही माणसं कोण ? ही अशी गुपचुप का आली ? आणि गुपचुप कुठे गेली ? त्या घरात काय असेल ? तो राजा तर आत नसेल ना ? झंप्याच्या मनात पुन्हा उत्सुकता जागी झाली. एवढाही आवाज न करता तो सरपटत पुढे निघाला. त्या घराला

लागूनच कसले तरी झाड होते. झंप्या खारीसारखा झाडावर चढला. झाडावरून त्यानं एक पाय घराच्या छपरावर ठेवला. त्या छपरावर एक लहानसे काचेचे तावदान लावलेले होते. झंप्यानं हळूच त्याला नाक लावलं. डोळे मोठ्ठे करून आत पाहिलं—

ओ हो ! केवढी गंमत ! तिथे जमलेले ते चार-पाच लोक कोंडाळं करून बसले होते. मध्ये छान छान काचेचे लोलक होते आणि ग्लुकोजची चमकणारी बिस्किटं पण होती. झंप्याला वाटलं आनंदानं टाळ्या वाजवाव्यात. पण त्या लोकांनी पाहिलं तर ? त्याची नक्कीच खात्री झाली की, हे सगळे लोलक राजाचे असणार आणि या भामट्यांनी ते चोरले असणार. झंप्यानं रागानं हवेत एक ठोसा उडवला. उद्या सकाळी उठल्याबरोबर इथं यायचं, असं त्यानं ठरवलं. आपल्या बॅगेमध्ये ते सगळे लोलक भरून इथून पळ काढायचा आणि ते लोलक राजाला नेऊन द्यायचे, असा त्यानं निश्चय केला. पण इथून परत कसं जायचं ? त्यासाठी ती माणसं बाहेर पडेपर्यंत बसणं भाग होतं. झंप्या तसाच हुडहुडत बसून राहिला. जरा वेळानं ती माणसं एक-एक करत बाहेर पडली. दरवाजा बंद झाला. आता तो बुरखेवाला माणूसही भलं मोठं कुलूप लावून बाहेर पडला. तो बराच लांब गेल्यावर झंप्यानं झाडावरून खाली धप्‌कन् उडी मारली आणि तेवढ्या अंधारात तो जोरात धावत सुटला.

जरा वेळानं आपल्या मागून कुणीतरी धावतंय हे त्याच्या लक्षात आलं. कोण आहे हे पाहायचाही त्याला धीर होईना. झाडाझुडपातून, कुंपणं पार करून झंप्या सुसाट धावतच होता. जरा रस्त्याला आल्यावर त्यानं मागं पाहिलं तर धावणारा माणूस त्याच्या अगदी जवळ येऊन ठेपला होता. तो ओरडला, ' ए पोरा, थांब. आमचे नारळ चोरतोस काय ?'

तसा झंप्याला धीर आला. तो श्वास टाकत म्हणाला, ' नाही हो काका, मी कशाला चोरी करू ? मी वाट चुकलोय.'

त्या माणसानं झंप्याला नीट निरखून पाहिलं. हे पोरगं बाहेरगावचं आहे हे त्याच्या लक्षात आलं. तशी त्यानं दरडावून विचारलं, ' एवढ्या

रात्री कुठं भटकत होतास?' 'अहो मी वाघ पाहायला आलो होतो.' हा काहीतरी खुळचटासारखा बोलतोय हे त्या माणसाच्या लक्षात आलं. त्यानं झंप्याचा ठावठिकाणा काढून त्याला घरी पोहोचता केला. एवढ्या रात्री झंप्याला घेऊन एक परका माणूस आलेला पाहून झंप्याच्या वडिलांना भारी आश्चर्य वाटलं. वडिलांना पाहून झंप्याला धीर आला. तो ताबडतोब त्यांच्याकडे धावला. आणि घाईघाईत म्हणाला, 'बाबा, बाबा, मी एक गंमत बघून आलो. अहो, केवढे तरी लोलक आणि ग्लुकोजची बिस्किटं पण होती. पण की नै, ती सगळी चमकत होती. आणि पाच-सहा मोठी माणसं-'

'गप रे बाबा, वेड्यासारखा बोलू नकोस.' झंप्याच्या बाबांनी त्याला गप्प केलं. पण तो परका माणूस मात्र सावधपणं ऐकत होता. तो पुढं होऊन म्हणाला, 'मी इन्स्पेक्टर सावे. रात्रीचे आम्ही लोक सावधच असतो. या भागातून तक्रारी आल्या होत्या. म्हणून आम्ही गेला महिनाभर इथं आहोत. तुमचा मुलगा काय सांगतोय ते नीट ऐका.'

इन्स्पेक्टर साव्यांनी झंप्याला प्रेमानं जवळ घेतलं. गोड गोड बोलून त्याच्याकडून सगळी माहिती काढून घेतली. आणि तेवढ्या रात्री झंप्याचे बाबा, इन्स्पेक्टर सावे आणि दोन पोलीस झंप्याला बरोबर घेऊन लोलक पाहायला निघाले. ती सर्व माणसं अगदी एवढाही आवाज न करता चालली होती. सर्वजण आपापल्या विचारात मग्न होते.

झंप्याला मात्र खूप हसू येत होतं. कमालाय् बाबा या मोठ्या माणसांची! आता काय मोठी माणसं पण लोलकं जमवायला लागली वाटतं? आता ती चार-पाच माणसं आणि ही चार-पाच माणसं, मस्त फायटिंग होईल. धमाल मजा. झंप्या कॉलर ताठ करून सर्वांच्या पुढे चालला होता. इन्स्पेक्टर सावे बॅटरीच्या प्रकाशात रस्ता शोधत होते.

त्या बैठ्या घराशी मंडळी पोहोचली तेव्हा सगळीकडे सामसूम होतं. झंप्याच्या सांगण्याप्रमाणं ती माणसं कुलूप लावून बाहेर पडली होती. घराला कुलूप लावलेलं दिसतच होतं. पण सगळ्या गोष्टी इतक्या सरळ असतील असं साव्यांना वाटेना. त्यांनी झंप्याच्या वडिलांना

पोलीसस्टेशनवर पाठवलं. आणखी पोलिसांची मदत कदाचित् लागली असती. झंप्याचे वडील दूर गेले आणि साव्यांनी एक पोलीस सोबत घेतला. बॅटरीचा प्रकाश टाकून आवाराला फेरी मारली. त्या बैठ्या धराला लागून एक छोटासा बंगला होता. त्या बंगल्यालाही कुलूप होतं. साव्यांनी ते कुलूप फोडलं आणि दार उघडलं. दार उघडल्याबरोबर पोलीस आत शिरला आणि दुसऱ्याच क्षणी पोलिसाच्या डोक्यात कुणीतरी जबरदस्त वार केला त्याच्या किंकाळीनं आसपासच्या वातावरणात मोठा आवाज घुमला. इन्स्पेक्टर सावे सावध होते त्यांनी बॅटरीचा मोठ्ठा झोत आत टाकला. हातातलं पिस्तूल रोखून धरत ते करड्या आवाजात ओरडले, 'खबरदार कुणी पुढे याल तर?'

इन्स्पेक्टर सावे पिस्तूल रोखून सज्जच होते...



आतमध्ये थोडा धडपडीचा आवाज झाला आणि पुन्हा सर्व शांत झालं. या गडवडीत झंप्या डोळे गच्च मिटून समोरच्या झाडाला मिठी मारून उभा होता. काय होतंय हेच त्याला कळत नव्हतं. एवढ्यात कुणीतरी झंप्याला उचललं आणि वेगानं त्या बैठ्या घरात शिरलं. झंप्या पाहत होता, एका आडदांड माणसाच्या पाठीवर आपण वसलोय, एवढंच त्याला कळलं. त्या माणसानं जमिनीवर जोरदार दाव दिला. आणि केवढं आश्चर्य, जमीन आपोआप वाजूला झाली. तिथे लांवलचक पायऱ्या दिसत होत्या. मोठाच्या मोठ्ठा बोगदा होता तो. आपण या बोगद्यात नाहीसे होणार हे झंप्याला कळलं. आणि जीवाच्या आकांतानं तो ओरडला, 'वावा, बोगद्यात या, वावा—'पुढे काही ओरडण्यापूर्वी त्याच्या तोंडावर जोरदार थप्पड वसली. आणि झप्या तिरीमिरी येऊन बेशुद्ध पडला. कुठल्यातरी भिंतीसारख्या दणकट खांद्यावर त्याची मान होती. आणि तो आडदांड माणूस झरझर पायऱ्या उतरून बोगदा पार करीत होता.

इन्स्पेक्टर साव्यांनी झंप्याची किंकाळी ऐकली. एक क्षणभर ते विचारात पडले. झंप्याकडे धाव घ्यावी की इथल्या लोकांचा समाचार घ्यावा ? एवढ्यात आणखी दोन शिपाई मदतीला आले. पाठीमागून कुमक येत होती. वरोबरच्या शिपायांना त्यांनी तिथेच थांवण्याची खूण केली. वेगानं दरवाजा बंद करून त्याला कडी घातली. आणि ते धावत त्या बैठ्या घरात शिरले. घराचं दार उघडंच होतं. आत कुणीही नव्हतं. कसलंही सामान नव्हतं. एका कोपऱ्यात थोडा कचरा आणि अडगळ होती. इथं कुणी राहत असेल असं वाटत नव्हतं. ते काळजीत पडले. कुठे गेला झंप्या ? काय झालं त्याचं ? त्या चोराने पळवलं की काय ? त्याला मारणार तर नाहीत ? त्यांना काही सुचेना. वाहेर पण माणसांची चाहूल नव्हती. म्हणजे झंप्या आणि तो माणूस वाहेर पळाले नाहीत एवढं खास. मग... ?

त्यांना एकदम आठवलं, झंप्या ओरडला होता, 'वावा बोगद्यात या–' बोगदा कुठला ? इन्स्पेक्टर साव्यांनी सगळ्या भिंती वाजवून पाहिल्या. जमिनीवर चाचपडून पाहिलं. आणि तेवढ्यात त्यांच्या

हाताला एक कळ लागली. ती त्यांनी जोरात दावली. त्यावरोवर जमिनीचा भाग वाजूला झाला. इन्स्पेक्टर साव्यांनी बॅटरीचा झोत टाकला. वापरे ! केवढा लांबलचक रस्ता. आठ दहा पायऱ्या आणि पुढे लांबच लांब रस्ता. सगळीकडे अंधार होता. एका वेळी दोन माणसंसुद्धा नीट जाऊ शकणार नाहीत, असा होता. एका दृष्टीनं त्यांना बरं वाटलं शत्रूची माणसं अधिक असली तरी भीती नव्हती. एकावेळी एकालाच तोंड द्यावं लागणार होतं. त्यांनी स्वतःशीच चटकन् निर्णय घेतला आणि वेगानं पायऱ्या उतरायला सुरुवात केली. हातात पिस्तुल सज्ज ठेवलं. पण मुद्दामच बॅटरी बंद करून टाकली. पायाचा एवढाही आवाज न करता ते झर्‌झर् जिना उतरू लागले. दहा एक मिनिटं चालल्यावर त्यांना बोलण्याचा आवाज ऐकू आला, त्या पायवाटेच्या दोन्ही अंगाला छोटी छोटी दारं होती. त्या खोल्या असाव्यात. कारण आतून बोलण्याचा आवाज येत होता. आता काय करावं याचा सावे विचार करू लागले. दार वाजवणं धोक्याचं होतं. एखाद्या वेळेस दुसरी चोरवाट असायची. त्या वाटेनं हे लोक पळून जाण्याची भीती होती. इन्स्पेक्टर त्या खोल्या ओलांडून हळूच पुढे गेले. आणि साधारण बोलण्याचा आवाज दूर गेल्यावर वेगानं धावत सुटले. त्यांना आता त्या तळघराचं टोक गाठायचं होतं. बंगल्याच्या दाराशी पोलीस होताच. बैठ्या घराच्या खुणेशी पोलिसांना घेऊन झंप्याचे वावा येणार होते. आता झंप्याचा शोध लावणं आवश्यक होतं. तळघराचा रस्ता सरळ होता. लांबलचक बोगदा आपण दुसऱ्या टोकाकडून वाहेर पडायला पाहिजे असं इन्स्पेक्टरांनी ठरविलं. बोगद्याच्या तोंडाशी ते येईपर्यंत मागून आवाज ऐकू येऊ लागला. आता त्यांच्या जीवाला धोका होता. ते आणखीनच जोरात धावू लागले. एवढ्यात तळघराच्या तोंडाशी अंधूक उजेड दिसला. म्हणजे हा वाहेर पडायचा रस्ता होता तर. तिथून ते वाहेर आले. तोंडाशीच दाट झाडी होती. तिथे तळघर आहे याचा अंदाजही येत नव्हता. झुडपातून वाहेर आल्यावर एक छोटी पायवाट होती. आजूबाजूला गर्द रान होतं. त्या रानात माणूसच काय पण हत्ती लपला असता तरी दिसला नसता. तेव्हा येणाऱ्या माणसांना झुडपाच्या तोंडाशीच अडवायला हवं होतं.

इन्स्पेक्टर सावे झुडपाच्या तोंडाशी जरा बाजूला लपून राहिले. कोण येतंय याचा अंदाज घेऊ लागले. हळूहळू चार-पाच आवाज ऐकू येऊ लागले.

'...तुम्ही पुढे व्हा.'

'या मुलाला तुमच्यावर सोपविलं आहे.'

'पाठीमागून पोलीस येतायत्‌—सावधान...'

इन्स्पेक्टर सावे डोळ्यांची पापणीही न हलवता पाहू लागले. झंप्याला खांद्यावर घेऊन एक माणूस झुडपाबाहेर येत होता. त्याच्या मागे आणखी दोन माणसं असावीत. प्रसंग लक्षात घेऊन साव्यांनी हवेतच जोरात ठो ठो आवाज काढले. माणसं दचकली. बाहेर किती लोक उभे आहेत याचा त्यांना अंदाज येईना. मागून पोलीस, पुढून पोलीस ते लोक वाट मिळेल तिकडे धावत सुटले.

उलट दिशेला पोलीस पहारा होताच. झंप्याचे बाबा बरीच मोठी तुकडी घेऊन त्या बैठ्या घराशी आले होते. त्यांनी बंगल्यातल्या लोकांना ताब्यात घेतले. त्यांना बेदम चोपून तळघराचा पत्ता मिळविला. पोलिसांची तुकडी तळघरात घुसली. त्या अंधाऱ्या तळघरात ठोसे मारल्याचे आवाज येऊ लागले. एकच गडबड उडाली. पोलीस येताहेत याचा साव्यांना अंदाज आला. ते दमदार आवाजात ओरडले— 'तुम्ही पोलिसांच्या ताब्यात आहात. कसलाही दंगा न करता आमच्या स्वाधीन व्हा. चला, एक एकजण बाहेर पडा.'

हळूहळू बारा चोरांची टोळी, पाठीमागे पोलीस आणि झंप्याचे बाबा एवढी मंडळी घराबाहेर पडली. झंप्याला इन्स्पेक्टर साव्यांनी ताब्यात घेतलं. चोरांना हातकड्या घातल्या. ती सर्व मंडळी पोलीस स्टेशनवर आली, तेव्हा पहाटेचे पाच वाजले होते.

दुसरे दिवशी सकाळी कळलं की चोरट्या हिऱ्या-मोत्यांची आणि सोन्याची आयात करणारी एक फार मोठी टोळी हाती लागली आहे. मग काय विचारता! झंप्याला घेऊन सगळी मंडळी स्पेशल लाँचनं मुंबईला रवाना झाली.

०

झंप्या एवढ्या लवकर परत आलेला बघून त्याचे मित्र धावत आले. झंप्या हिरमुसल्या तोंडानं एका कोपऱ्यात बसला होता. तो घाबरलाही होता आणि मार खाल्ल्यामुळे आजारी दिसत होता. मुलं विचारू लागली, ' झंप्या रे, राजा भेटला तुला ?'

' झंप्या, राजानं तुला ढिशांव केलेलं दिसतंय.'

' दे आमचे लोलक परत. '

' दे आमचे छाप परत. '

' झंप्या घाबरला, मुळूमुळू रडला. '

आता मात्र झंप्याला खरंच रडू यायला लागलं. आपण एवढ्या लवकर का परत आलो हेच त्याला कळेना. ते लोक कोण होते, त्यांनी मारामारी का केली ? आणि बापरे, काय तो पिस्तुलांचा आवाज— ठोऽऽ ! आणि तो माणूस, वाईट कुठला ! राक्षस ! आपल्याला कसा ठोसा मारला. झंप्याच्या डोळ्यांपुढे आतासुद्धा काजवे चमकले. कुठं गेला तो ? आपल्याला शोधत येईल ? झंप्याच्या अंगावर सरसरून काटा आला आणि त्यानं उशीत तोंड लपवलं. एवढ्यात त्याला हाक ऐकू आली, ' काय झंपूनाना बरं वाटतं की नाही अजून ? हे बघा आम्ही काय गंमत आणली आहे.'

झंप्यानं हळूच डोळे किलकिले करून पाहिलं. दारात इन्स्पेक्टर सावे उभे होते. त्यांच्या हातात भला मोठा चॉकलेटचा पुडा होता. झंप्यानं टुणूकन उडीच मारली. चॉकलेट बघून तो आनंदानं नाचायला लागला. तेवढ्यात इन्स्पेक्टर म्हणाले, ' चला, आता छान कपडे घालून. माझ्या-बरोबर बक्षीस घ्यायला चला. '

' बक्षीस ? कशाकरिता ?'

' अरे झंपू, तू खूप चोरट्यांची मोठी टोळी पकडून दिलीस ना ? म्हणून हो. '

' कोण देणार बक्षीस ? लोखंडाचा कोट घातलेला राजा ? तो भेटेल का हो मला ?' इन्स्पेक्टर साव्यांना काही कळलं नाही पण झंप्याचं ते बोलणं ऐकून ते मोठ्याने हसले. झंप्या छानदार कपडे घालून ऐटीत जीपमध्ये जाऊन बसला. संध्याकाळी तो परत आला तो खूप बक्षिसं घेऊन.

दुसऱ्या दिवशी त्याचा फोटो वर्तमानपत्रांत बघून सगळी मित्र-मंडळी धावत आली. पण आता झंप्याला भलताच भाव चढला होता. त्याच्या भोवती मित्र गोळा झाले. अप्पूनं विचारलं, झंप्यारे, तू चोर पकडलास ?'

'येस्' झंप्या इंग्रजीत बोलला.

'कसारे पकडलास ?'

झंप्यानं दोन्ही हातांवर हनुवटी टेकली. अतिशय विचारी चेहरा केला आणि मग एकदम म्हणाला, 'आयला, काय फार्यटिंग केली आहे. हे चार-पाच लोक माझ्या अंगावर धावत आले. मग मी एकाला जोरदार गुद्दा मारला. दुसऱ्याला लाथ मारून हवेत उडवून दिला. माझ्या बाजूला राजा उभा होता. त्याच्या हातातली काठी घेतली आणि हे ऽ सपासप सपासप् मारत सुटलो... '

सगळे मित्र झंप्याची शौर्यकथा ऐकण्यात गढून गेले होते. पराक्रमी झंप्या फडाफड् बोलून सगळ्यांना गार करत होता. आणि झंप्याचे आई-बाबा मात्र त्याचा पराक्रम ऐकताना पोट धरून हसत होते.

• • •

# ५. झंप्या पोहायला शिकतो

धो धो पाऊस कोसळत होता. पावसाच्या पांढऱ्या शुभ्र धारा अंगणात नाचत होत्या. लहान, लहान मुलं पाण्यात थुयथुयत होती. ओंजळीत पाणी पकडून ठेवत होती. कुणी कुणी होड्या सोडत होते. होड्या कुठल्या कुठं वाहून जात होत्या. पण मुलांचा खेळ संपत नव्हता. पाण्याच्या सपकाऱ्यानं भिजूनदेखील मुलं पाण्याला कंटाळत नव्हती घरातल्या मोठ्या बायका मात्र अंगाची घडी करून बाहेर पाहत होत्या. ' बाई ऽ केवढा हा पाऊस ! या कार्ट्यांना बाहेर जाऊ नका म्हटलं, तर ऐकत नाहीत.'

' अहो, मुलं अशीच. आमचा पप्पू तर सकाळीच खाली उतरलाय. गेटापाशी बघा, सगळी मुलं नाचतायत ती ! ' बायकांच्या तक्रारी चालू होत्या. आपली आई अंगाभोवती पदर लपेटून हुडहुडत उभी आहे हे झंप्यानं पाहिलं, आईपण गप्पात सामील झाली होती. बाबा कुठल्यातरी पुस्तकात डोकं खुपसून बसले होते. रंगात सिग्रेट फुंकत होते. झंप्यानं कॉटवरून टुण्दिशी उडी मारली. आईच्या नजरेआड झाल्याबरोबर, झपाझपा जिना ओलांडून तो तळमजल्याला पोचलादेखील.

खाली गणू, जनू आणि बग्या वगैरे मंडळी उभी होती. झंप्या आल्याबरोबर बग्यानं सूर धरला.

' झंप्क् नाना....

डिणी डिणी डिणी डिण्....

झंप्या गरजला, ' काय रे, माझी फिरकी घेतोस काय ? उचलून ठेवीन तुला, माहीत नाही. '

' अरे जारे उचलणाऱ्या ! झंपूनाना, तू पोहून दाखवशील काय ? '

' पोहून ? ....झंप्या विचारात पडला. आजपर्यंत त्याला पोहून दाखवशील का ? असं कुणीच विचारलं नव्हतं. म्हणजे, यांना सगळ्यांना पोहता येतं आणि आपल्यालाच येत नाही ? झंप्यानं हळूच विचारलं, ' तुम्हाला येतं का रे पोहायला ? ' गणू म्हणाला, ' आम्हाला येत नाही. पण वग्याचे बाबा आम्हाला शिकवणार आहेत, तू पण येशील शिकायला? जा आईला विचारून ये. '

झंप्या त्याच पावली घरी परतला. एव्हाना आईच्या गप्पा संपल्या होत्या. आई आतल्या खोलीत अमृतांजन फासून अंगावर गोधडी पांघरून झोपली होती.

' लागली वाऽट ' झंप्या पुटपुटला. आई अशी झोपली की झालं. कुणी खट्टसुद्धा आवाज करायचा नाही. झंप्या काळजीत पडला. सगळे मित्र तर पोहायला चालले होते. मग, आपण काय करायचं ? सगळे पोहायला शिकणार, सूर मारणार, पाण्यात खेळणार आणि आपण मात्र ' झंप्कनाना' होऊन राहायचं. झंप्यानं मुद्दामच टेबलावरची पट्टी खाली टाकली. आईनं कुशी बदलली. पण तिचं उठण्याचं लक्षण काही दिसेना. झंप्यानं पाणी प्यायचं निमित्त करून भांडंच हातातून खाली सोडलं. टाण् टाण् टाण् भांड्यानं तीन कोलांट्या खाल्ल्या. ' वैरी मेला–' आई कडाडली. ' पाच मिनिटं काही पडू देत नाही. ' झंप्याला आतून खुदकन् हसू फुटलं. तो मुद्दामच मोठ्या आवाजात म्हणाला, ' अग, तहान लागली आई. पाणी पितोय. '

' एवढ्या पावसात तहान कसली लागली तुला ? आणि आता पावसात खेळायला जाऊ नकोस. '

' खाली खेळायला कुणी नाहीचाय्, सगळे पोहायला चाललेत. '

' मग गप्प झोप तू. '

' झोप काय आई ? ' झंप्या कुरकुरला. आईच्या उशीवर डोकं घुसळून पुटपुटला.

'आई, मी पण जाऊ पोहायला ?'

आईनं तोंडावरून गोधडी दूर फेकली. आणि उठून बसत ओरडली, काही जायचं नाही पोहा-विहायला. हवा कसली पडलीआय् ऽऽ. पाऊस केऽवढा कोसळतोय !

'अग पण, पावसातच मजा असते.'

'कसली, बुडायची ? मोठं कोण आहे तुमच्याबरोबर ?

'बग्याचे बाबा येणार आहेत.'

'बग्याचे बाबा आपल्या मुलाला सांभाळतील. तुमच्याकडे कोण लक्ष देणार ? काही जायचं नाही पोहायला. आणि हे बघ, तोंडबींड वाकडं करायचं असेल तर तुझ्या बाबांना विचार जा. मला नको सांगूस.'

झंप्या बाबांपुढे जाऊन उभा राहिला. बाबा वाचनात दंग होते. झंप्यानं चुटक्या वाजवल्या, टेबलावर टक् टक् करून पाहिलं. पण बाबा जाम वर बघेनात. शेवटी बाबांच्या जवळ जाऊन तो हळूच पुटपुटला,

'बाबा, मी बाहेर जाऊ ?'

बाबांनी ऐकलं न ऐकलंसं केलं. झंप्यानं पुन्हा हळूच विचारलं, 'जाऊ ?' बाबांनी मान डोलावली. 'पोहायला जाऊ का ?' असं झंप्यानं विचारलंच नाही. मोठ्या खुबीनं तेवढंच नेमकं वगळलं. बाबांनी परवानगी देताच झंप्या सुसाट पळत सुटला.

खाली येऊन पाहतो तर काय, सगळी मुलं गेलेली. झंप्याला रडूच कोसळलं. तिथेच भिंतीला टेकून तो गप्प उभा राहिला. एवढ्यात तिथं अप्पू आला. टप्पू पण आला. झंप्याचा रडवा चेहरा बघून अप्पूनं विचारलं' 'काय रे झालं ?'

'अप्पू, तुला पोहता येतं का रे ?'

'हॅट् ! आपल्याला पाण्याची बाबा भीती वाटते.'

'भीती क्याय वाटते ?' झंप्यानं वेडावलं.

'बायल्याच आहेस. आपण असं घाबरायचं नसतं.' तेवढ्यात टप्पू म्हणाला,

'मी नाही रे घाबरत. पण आपल्याला पोहायला कोण शिकवणार ?'

झंप्या डोकं धरून बसला. मग जराशानं म्हणाला, 'कोण कशाला हवंय शिकवायला ?

आपणच शिकू की, हे बघ, समुद्रात पोहणं अगदी सोपं. लाट आली की, धड्ल्कन् आपण काठावर येणार. मग त्याच्यावर स्वार व्हायचं. मग सूंऽऽकन् आत जायचं. मग असं करीत चार–पाच वेळा लाटेवरून आत-बाहेर आलो की, आपोआप पोहायला येईल.'

टप्पू डोळे मोठे-मोठे करून ऐकत होता. तो एकदम म्हणाला, 'झंप्या तू शूर आहेस तू जा, सूं ऽऽ थड्ल् करायला. आपण नाही येणार.'

'आयला, पाण्याच्या केवढ्या मोठ्या लाटा येतात माहिताय् ? आपण चक्क त्याच्या पोटातच शीरणार आणि मग समुद्रात खोल खोल जाणार. आणि समुद्राच्या पोटात देवमासा झोपलेला असतो, अजगर असतो. त्यानं नुसतं ऑऽऽ करून श्वास घेतला, की आपण त्याच्या पोटात. म्हणजे मरून जाणार. नकोरे बाबा, झंप्या तू आपला जा पोहायला.' अप्पूनं भीत भीत सांगितलं.

'तुम्ही पोचट आहात सगळे.' झंप्या गरजला, 'मी शिकेन की नाही बघ पोहायला !' झंप्या बोलून गेला खरा पण त्याला कुणाकडे पोहणं शिकावं हे कळेना. तो तसाच हिरमुसल्या मनानं वर आला. एका कोपऱ्यात गप्प बसून राहिला. बसल्या बसल्याच त्याला डुलकी आली. पण झंप्या अस्वस्थ होता. मध्येच झोपायचा, मध्येच उठायचा, झोपेतल्या झोपेत तो दोनदा पाण्यात बुडलादेखील. एकदा तर तो पोहण्याची शर्यतदेखील जिंकून आला. आणि जागा झाला तेव्हा त्याला कळलं की, आपण चटईवरच हात-पाय मारतोय. झंप्याला फार वाईट वाटलं. हे उपयोगाचं नाही. यातून मार्ग काढलाच पाहिजे. झंप्या ताड्कन् उठला आणि संजूदादाकडे जाऊन थडकला. संजूदादा शांतपणानं कसलं तरी चित्र काढत बसला होता. झंप्यानं विचारलं, 'संजूदादा, तुला पोहायला येतं ?

'हो.'

'चांगलं ?'

'अगदी मस्त.'

'म्हणजे समज की, कुणीतरी...नाहीतर मीच गटांगळ्या खायला लागलो, तर तू मला वाचवशील.'

झंप्याच्या या बोलण्यावर संजूदादा हसला. म्हणाला, 'तू गटांगळ्या कशाला खातोस पण? काय हवंय तुला?'

'मला पोहायला शिकायचंय?'

'हॅट् तिच्या, एवढंच होय. मग एखाद्या स्विमिंग् टँकला नाव घाल की.'

'आई परवानगी देणार नाही रे. तू कुठे शिकलास पोहायला?'

'मी माझ्या आजीकडे शिकलो.'

झंप्यानं हळूच विचारलं, 'मग तुझी आजी शिकवेल मला पोहायला?

संजूदादा मोठ्याने हसला. साडीचा काचा मारून सूर मारणारी आजी त्याच्या डोळ्यांपुढे उभी राहिली, 'अरे झंप्या, माझी आजी नाही पोहत. ती राहते पुण्याला. सुट्टीत मी तिच्याकडे गेलो असताना महाराष्ट्र मंडळात नाव घातलं. तिथे पोहायला शिकवतात.'

'महाराष्ट्र मंडळ' असं पुटपुटत झंप्या घरी आला. त्याचं कशाकडेच लक्ष नव्हतं. फक्त पोहण्याचाच विचार. पुण्याला जायचं आणि महाराष्ट्र मंडळात नाव घालायचं असा त्यानं निश्चय केला.

रात्री जेवताना त्यानं बाबांना विचारलं, 'बाबा, तुम्हाला पुण्याचं महाराष्ट्र मंडळ माहिती आहे?'

'हो, का रे बाबा? तिथले शि. वा. दामले माझे दोस्त आहेत. त्यांच्या महाराष्ट्र मंडळात केवढी छोटी छोटी मुलं पोहायला येतात. मोठं छान आहे हं मंडळ.'

'आणि तुमचे ते दोस्त कसे आहेत हो बाबा?'

'कोण दामले? अरे काय छान माणूस आहे. सिंहासारखा. ते मुंबईला आले की, मी तुझी ओळख करून देईन हं.'

विषय तेवढाच राहिला. पण झंप्याचं डोकं स्वस्थ बसेल तर ना? झंप्यानं लगेच आपल्या ढबाळ्या अक्षरांत दामले काकांना पत्र लिहायला घेतलं. हे पत्र आपण घरी न सांगता लिहितो आहोत, हेही त्यानं लिहिलं होतं. आणि वर लिहिलं होतं, 'काका, मला पोहायला खूप खूप आवडतं. तुम्ही मला शिकवाल? मी बग्याच्या बाबांनादेखील रेसमध्ये

हरवणार आहे. आणि काका, बाबा म्हणतात, तुम्ही सिंह आहात म्हणून. मला तुमच्यासारखं सिंह व्हायचंय. तुम्ही कराल मला सिंहासारखा शूर ?' पत्र पोस्ट करून झंप्या उत्तराची वाट पाहू लागला.

बरोबर आठ दिवसांनी महाराष्ट्र मंडळातर्फे झंप्याला खास आमंत्रण आलं. झंप्यासारख्या धीट व हुशार मुलाला पोहण्याचे शिक्षण द्यायला आम्हांला अभिमान वाटेल, असं त्यात लिहिलं होतं. यापूर्वी झंप्याचे वृत्तपत्रात आलेले फोटो व त्याचा झालेला गौरव याचाही उल्लेख केला होता. ते पत्र पाहून आई-बाबांना अतिशय आश्चर्य वाटलं. झंप्या मात्र न फुटलेल्या मिशीला पीळ देत खुदकन् हसला. त्याचा आनंद पोटात मावेना. तो धावत धावत पोस्टाच्या पेटीजवळ गेला. पत्र पोस्ट केलं होतं तिथं येऊन उभा राहिला. त्यानं आसपास पाहिलं, रस्त्यावर कुणीही नव्हतं. मग त्यानं पेटीला एक दणदणीत सलाम ठोकला. आणि तो आनंदानं ओरडला. ' थँक्यू काका, थँक्यू ! '

०

झंप्या पुण्याहून पोहणं शिकून आला. तो आला तोच टेचात. त्याला भलताच आत्मविश्वास आला होता. भोवती जमलेल्या मित्रांना किती सांगू आणि किती नको असं झालं होतं.

झंप्याच्याभोवती मित्रांचं कोंडाळं पडलं होतं. अप्पूनं तोंडाचा चंबू करत विचारलं, ' तू वाट्टेल तेवढा पोहशील ?'

झंप्या म्हणाला, ' हो ऽ '

' म्हणजे, एवढा मोठ्ठा सगळा समुद्र पोहून जाशील ? लांब तिकडे आकाशाला हात लावून येशील ?'

' हो, त्यात काय ? मी आकाशाचा एक तुकडासुद्धा तोडून आणला होता.'

' कुठाय ? दाखव बघू.' अप्पू चेवानं बोलला. ' कुठाय म्हणजे काय ? मी समुद्रात पुन्हा फेकून दिला. तो आता गेला असेल तरंगत तरंगत लांब.' यावर मात्र अप्पूला काहीच बोलता येईना. आकाशाचा तुकडा तोडणारा झंप्या त्याला भलताच ग्रेट वाटला. अप्पूनं पुन्हा उत्सुकतेनं

विचारलं, 'काय रे झंप्या, मग ते सिंहकाका भलतेच शूर असतील नै? ते तर काय सगळं आकाशसुद्धा तोडून आणतील नाही का रे?'

'तर–' झंप्या अभिमानानं म्हणाला.

'अरे, एकदा ते पोहण्याच्या शर्यतीत होते हं. तर पोहता पोहता ते खूप लांब गेले. वाटेत एक मोठी बोट आली. मग काय, काकांचा रस्ताच अडला. पण काका डरतात की काय? त्यांनी अशी बोट उचलली आणि गरागर फिरवून उंच फेकून दिली. मग सबंध अठरा तास ती बोट आकाशात गरागर फिरत होती–'

'आणि त्यातली माणसं?'

'ती पण फिरत होती. आणि मग काकांनी ती बोट उचलून पुन्हा पाण्यात सोडून दिली,'

'आयला, काय मज्जा नै रे?' अप्पूनं टाळ्या वाजवल्या. 'पण काय रे झंप्या, तुझे ते काका शर्यतीत जिंकले का रे?'

'यडपटच आहेस.' झंप्या मोठ्यानं हसत म्हणाला.

'अरे, काका असे मस्त पोहतात, की त्यांच्यापुढं कुणी टिकूच शकत नाही. त्यांनी स्वतः मला पोहायला शिकविलं.' झंप्याला काकांच्याबद्दल आणखी खूप खूप गोष्टी सांगायच्या होत्या. पण अजून त्यानं त्या नीट जुळवल्या नव्हत्या. त्यामुळं तो नुसताच विचार करीत गप्प राहिला. पण त्याला महाराष्ट्र मंडळ इतकं आवडलं होतं की, तिथं जाऊन सैनिकी शिक्षण घ्यायचं त्यानं नक्की करून टाकलं.

आपल्या मनातले सगळे निश्चय झंप्या आईला ऐकवायचा. आई ऐकायची आणि सोडून द्यायची. पण तिनं त्याला बजावून ठेवलं होतं, 'झंप्या, कितीही पटाईत असलास तरी पोहायला एकटं जायचं नाही हो.'

'का नाही एकटं जायचं? आई तू मला डरपोक करू नकोस. सांगून ठेवतो. दामलेकाकांनी निरोपाच्या वेळी सांगितलं होतं–

'मित्रहो, तुम्ही भारताचे शूर सैनिक आहात. या देशाला मर्दांची गरज आहे. या देशाचं तुम्ही–'

‘अरे बावा, मला व्याख्यान ऐकवू नकोस.’ आई वैतागानं म्हणाली, ‘तुला सैनिक व्हायचं आहे ना ? मग मोठा हो. लहान मुलांनी एकटं पोहायला जायचं नाही. म्हणजे नाही.’

‘नाही म्हजे नाही.’ झंप्या पुटपुटत बाहेर गेला. या आईला काही-एक कळत नाही. स्वतः आहे भित्री आणि आम्हालाही भीती घालते. हिला पोहता येत नाही, सायकलवर बसता येत नाही, ही कशी शूर होणार ? आणि शूर झाली नाही तर भारतमातेचं ऋण कसं फेडणार ? त्याला आईची फारच दया आली. त्याचवेळी झंप्याच्या हेही लक्षात आलं, की दामलेकाकांचं भाषण आपल्या मित्रांनाही सांगावं. त्यांनीही शूर झालं पाहिजे. भारतमातेचं ऋण फेडलं पाहिजे, पण त्यांना हे माहीत आहे की नाही, कुणाला माहिती !

झंप्या संध्याकाळी मित्रांच्याबरोबर फिरायला गेला. मुलं फिरत फिरत माहीमच्या खाडीवर गेली. नवीनच बांध बांधलेला होता. त्यावर सर्वजण बसले. झंप्यानं खड्या आवाजात सांगितलं, ‘मित्रांनो, तुम्ही भारतमातेचं ऋण फेडलं पाहिजे.’

अप्पूनं मध्येच विचारलं, ‘ऋण म्हणजे कर्ज ना रे ?’

झंप्या ओरडला, ‘मध्ये मध्ये बोलू नकोस.’ एवढ्यात बबलूनं जोरात गळा काढला.

‘मी कुणाचं काही घेतलं नाही. झंपूदादा तुला मी आधीच सांगतो, परवा मी बबन्याची पेन्सिल घेतली तर आईनं मला चोप दिला. आपण नाही रे बावा कुणाचं ऋण घेतलं.’

झंप्या रागानं म्हणाला, ‘तू मूर्ख आहेस बबलू. हे ऋण मायेचं असतं. आपण प्रत्येकजण भारतमातेचं देणं लागतो. बोला, भारतमाता की जय–’

तेवढ्यात जोरात पावसाची सर आली. मुलं आनंदानं टाळ्या पिटत भिजत होती. ‘भारतमाताकी जय–’ म्हणून ओरडत होती. पाण्याच्या लाटा पुढेपुढे येत होत्या. त्या पाहून मुलांना आणखीच उत्साह येत होता. एवढ्यात रस्त्यावरच्या पोलिसानं सगळ्या मुलांना जोरात

ओरडून सांगितलं, 'चला रे, पळा घरी. कळत नाही का पाणी येतंय् ते ?'

पोलिसांच्या ओरडण्यानं बांधाच्या कडेला बसलेली मुलं जोरात धावत सुटली. धावताना त्यांची ढकलाढकली सुरू झाली. त्यातच एका लहान मुलाचा पाय घसरला, आणि तो थेट पाण्यात गेला.

वेळ भरतीची होती. पाणी सुसाट वेगानं येत होतं. मोठमोठ्या लाटा दुरून जेवढ्या छान दिसत होत्या, तेवढ्याच भीतीदायकही वाटत होत्या. मुलाच्या पडण्यानं एकच गोंधळ उडाला. आजूबाजूच्या मुलांनी गळा काढून रडायला सुरुवात केली. काय झालंय हे मिनिटभर कुणाच्याच



मागचा पुढचा विचार न करता झंप्यानं पाण्यात उडी टाकली.

लक्षात आलं नाही. कोपऱ्यावरच्या हॉटेलच्या बाहेर उभ्या असलेल्या एका गरीब बाईनं पोरगं वाहून चाललेलं पाहिलं. तिनं 'धावा, धावा' म्हणून ओरडायला सुरुवात केली, आणि काय होतंय हे कळण्यापूर्वीच झंप्यानं उंच लाटेवर उडी घेतली.

झंप्या वेगानं त्या मुलाच्या दिशेला जात होता. पुन्हा लाटेबरोबर दूर फेकला जात होता. त्या मुलाचं डोकं मध्येच दिसत होतं, मध्येच लाटेत गडप होत होतं, तरी देखील झंप्या तिरासारखा त्या मुलाच्या दिशेनं झेप घेत होता. अप्पू, टप्पू, बबलू आणि इतर लहान मुलं जिवाच्या आकांतानं ओरडत होती. बांधावर एकच हलकल्लोळ उडाला. तेवढ्यात तिथल्या एका कोळ्यानं पाण्यात उडी घेतली. झंप्यानं त्या मुलाला घट्ट धरून ठेवलं होतं. त्या दिशेला तो वेगानं पोचला. झंप्याच्या हातात त्या मुलाच्या शर्टाची कॉलर होती, आणि सपासप् पाणी कापता कापता झंप्या पार दमून गेला होता. कोळ्यानं ओरडून झंप्याला सांगितलं, 'माझ्या कमरेला मिठी मार, घाबरू नकोस, हात सैल सोडू नकोस.' झंप्या त्या कोळ्याच्या कमरेला लटकला होता, आणि दुसऱ्या हातानं त्यानं त्या मुलाची कॉलर घट्ट पकडून ठेवली होती. तिघं काठावर पोचले तेव्हा हाऽ मोठा जमाव जमला होता.

एव्हाना झंप्याची आई आणि चाळीतली बरीच मंडळी काठाशी आली होती. मुलांच्याकडून घरोघरी बातम्या पोचल्या होत्या. झंप्याच्या आईचा तर जीवच उडाला होता. झंप्याला सुखरूप बघून तिला तर जोरात रडंच फुटलं. झंप्याला घेऊन सर्वजण घरी परतले. झंप्या खूप दमला होता आणि थोडा घाबरलेलाही होता, पण त्या मुलाला आपण वाचवू शकलो याचा आनंदही त्याच्या चेहऱ्यावर होता. घरी आल्यावर कपडे बदलून, गरम कॉफी पिऊन झंप्या लगेच झोपी गेला. रात्रभर त्याला कसली स्वप्नं पडत होती कोण जाणे? सकाळच्या सकाळी त्याला लवकर जाग आली. पेपरला झंप्याच्या शौर्याची बातमी आली होती. आसपासची मंडळी त्याचं कौतुक करायला जमली होती. पाण्यानं निथळणाऱ्या झंप्याचा फोटोही पेपरात आला होता. झंप्यानं घाईघाईत पेपरातली बातमी वाचून काढली. तेवढ्यात बाहेर


म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६०५४ नों. दि ........
वि. बा।ले।वा। क्र. ........

त्याचं अभिनंदन करायला संजूदादा आल्याचं कळलं. झंप्या जाम बाहेर येईना. संजूदादा आत येत हसत म्हणाला, 'अरे बाहेर नाही का यायचं बक्षीस घ्यायला ?'

आपलं लाल झालेलं नाक रागारागानं पुसत झंप्या म्हणाला,

'मला नको बक्षीस. हे बघ त्या पेपरवाल्यानं काय लिहिलंय, म्हणे, 'मूर्ती लहान पण कीर्ती थोर. मी काय लहान आहे काय ?' त्यावर सर्वजण हसले. संजूदादा त्याची पाठ थोपटीत म्हणाला, 'बरं बाबा, मूर्ती महान आणि कीर्ती पण महान, झालं ! आपण तसं कळवू हं त्यांना. आता तरी घेशील बक्षीस ?'

संजूदादाच्या हातातलं मोठ्ठं कॅडबरी चॉकलेट बघून झंप्याचा राग कुठल्याकुठे पळाला. त्यानं घाईघाईत चॉकलेट ताब्यात घेतलं. आता त्याच्या दोस्त मंडळींना त्याला लगेच भेटायचं होतं. आपण पाण्याची लाट कशी फेकून दिली, आणि त्या मुलाला आणि घाबरलेल्या कोळयाला स्वतःच कसं काठावर आणलं, मध्येच आकाशाचा तुकडा कसा तोडला, या सगळ्या गमती त्याला मित्रांना रंगवून सांगायच्या होत्या. झंप्यानं हळूच चॉकलेट खिशात टाकलं, आणि घरातल्या सगळ्यांची नजर चुकवून तो धूऽऽम धावत सुटला.

• • •

# ५. केकबहाद्दर झंप्या झिंदाबाद

जाम थंडी पडली होती. आईची चौघडी अंगाभोवती लपेटून झंप्या झोपेचं सुख घेत होता. तेवढ्यात अप्पूनं हाक मारली. अप्पूची हाक ऐकून झंप्या तट्दिशी उठला. गॅलरीत येऊन उभा राहिला. खाली बबलू, अप्पू, टप्पू वगैरे मंडळी उभी होती.

'कुठे रे चाललात ?' झंप्यानं आश्चर्यानं विचारलं.

'कुठे म्हणजे ? झूऽऽम !' बब्यानं विमान उडाल्याची खूण केली. झंप्या म्हणाला,

'एवढ्या थंडीत जाणार ? आपण नाही रे बुवा !'

'न्यायले बुवा !' पप्पूनं नक्कल केली.

'हट् म्हातारा.' टप्पूनं त्याला चिडवलं. फिरायला, खेळायला झंप्या नसेल तर काही मजाच नाही. झंप्या म्हणजे हीरो. झंप्या द ग्रेट ! सगळ्या बाळगोपाळांचा लाडका. तोच येत नाही मग काय करायचं ? पोरांची तोंडं वाकडी झाली. तरीदेखील 'खाली ये ना रे' अशी अप्पूनं खूण केली. झंप्या चौघडी अंगाभोवती गुंडाळून तसाच खाली धावला. तो आल्याबरोबर सगळ्यांचे चेहरे उजळले.

'ए, चल ना रे खाली. आज काय मज्जा मज्जा बघायला मिळेल माहिताय् !'

'अरे, बबनच्या शाळेत न् सॅन्टाक्लॉस आला होता. त्यानं केवढा खेळ वाटला, आणि शाळेत सगळ्या मुलांना केक दिला. ठाऊकाय ?'

'अरे, हे काहीच नाही. आमच्या चिमाच्या शाळेत मस्त रंगीत फुगे

दिले आणि पीस लावलेली टोपी दिली. राजाच्या मुकुटासारखी. आपल्याला काही नाही रे.'

'हँ त्यात काय ?' झंप्या म्हणाला, 'आपण दिवाळीला नाही का मजा करीत ?'

'ते खरं रे, पण आपण ख्रिसमसला का नाही मजा करायची ? आपण पण करू या की मजा !' टप्पूनं आशेनं झंप्याकडं पाहिलं.

'हो, हो करू या मजा. उद्या आपण संजूदादाकडून टोप्या करून घेऊ या–'

'आणि टोप्यांना पिसं लावू या ना ?' अप्पूनं घाईघाईत विचारलं.

'हट्, आपण काय लेडीज् आहोत पिसाच्या टोप्या घालायला. आपण जन्टलमन आहोत. वी आर जन्टलमेन ! हिप् हिप् हुर्ये–' झंप्या ओरडला. त्याच्या पाठोपाठ बाकीची मुलं पण ओरडली. बब्यानं शंका विचारली, 'पण काय रे झंप्या, आपण पिसाच्या जागी काय लावायचं ? तलवारी लावायच्या का ?'

'यडपटच आहेस. डोक्याला कधी कुणी तलवारी लावतं वाटतं ? तलवारी कमरेला लावायच्या असतात.'

'मग डोक्याला रे काय लावू या ?'

'आपण टोपीला मोठे मोठे फुगे बांधू या.'


'आयडिया रे ! झंप्या तू खरोखरच ग्रेट आहेस. पण हे बघ, एखाद्याचा फुगा मधेच फाट्कन फुटला तर ? नाही तर...एखादा फुग्याबरोबर आकाशात उडून गेला तर ?'

'अरे हो.' झंप्या पुन्हा काळजीत पडला. तेवढ्यात अप्पूनं त्याला सुचवलं, 'आपण फिरायलाच जाऊ या ना दोस्त. तिथं की नाही, काय काय मस्त मस्त बघायला मिळेल. छान छान टोप्या, गमतीशीर पोषाख, ग्रीटींग कार्डस् आणि डोंगराएवढे मोठे मोठे केक–'

केकचं नाव ऐकल्यावरोबर सगळ्याच मुलांच्या तोंडाला पाणी सुटलं. 'खरंच डोंगराएवढे केक असतील का रे ? म्हणजे हिमालयाएवढा केक असेल ? तर मग मी मस्तपैकी दोर बांधेन पाठीला आणि सट् सट् चढून जाईन, आणि वर गेलो की क्रीमचे गोळेच्या गोळे तुमच्या

अंगावर फेकेन. सटॅक्! सटॅक्! डोंगराचं मुंडकं उडवेन. खाली केकचा पाऊस पडेल--' झंप्या वर्णन करीत होता, आणि मुलं कल्पनेनंच केक गोळा करीत होती. शेवटी सगळ्यांनी केक पाहायला जायचं नक्की ठरलं. काल अप्पू आपल्या बाबांबरोबर फिरायला गेला होता. तिथल्या दुकानात काचेआड त्यानं मोठ्ठे मोठ्ठे केक पाहिले होते. सगळ्या मुलांना घेऊन तो त्या दुकानाकडे निघाला.

भला थोरला हायवे उतरून मुलं रस्त्याला लागली. रस्त्यात हीऽ गर्दी होती. छान छान कपड्यातले लोक हिंडत होते. दुकानात रंगरंगीत वस्तू मांडून ठेवल्या होत्या. जिकडे तिकडे दिव्यांचा चकचकाट होता. मुलं एका दुकानाच्या समोर आली. त्या दुकानात काचेची भली मोठी शोकेस होती. तिथे छानदार केक करून ठेवला होता. त्याच्या बाजूला एक मुलगा उभा होता. तो केक कापण्यासाठी उभा आहे असं वाटत होतं. केक चांगला डेरेदार होता. त्याच्यावर काजूची नक्षी



होती. क्रीमची गुलाबी फुलं होती आणि मध्ये लिहिलं होतं, ' मेरी ख्रिसमस् '. अप्पूनं टाळ्या वाजवल्या. ' हाच तो केक. '

' आयला ! काय टॉप आहे रे ! मला तर ही फुलं तोडून खावीशी वाटतात. ' बव्यानं मत दिलं.

' अं, फुलं काय नुसतीच गोड गोड. आपल्याला त्यातले काजू उडवायला आवडतील, ' टप्पूनं आपलं मत सांगितलं. त्या भल्या थोरल्या काचेला नाकं चिकटवून मुलं उभी होती. केकचा डोंगर आपल्या डोळ्यांत साठवत होती. झंप्या मात्र अगदी गप्प होता. टप्पूनं विचारलं, ' काय रे झंप्या, तू कसला विचार करतोस ? '

झंप्या खरोखरच विचारात गढला होता. तो म्हणाला, ' मला असं वाटतं, मी त्या मुलाला बाजूला करून मीच तिकडे जाऊन बसलो तर? '

' अँ हँ रे ! तू कसा जाणार ? तो काय खरा मुलगा आहे थोडाच ? '

' आपण खरा मुलगा म्हणून जायचंच नाही. आपण खोटा मुलगा म्हणूनच जायचं. दुकान चालू आहे तोपर्यंत त्या मुलासारखं उभं राहायचं. हलायचं नाही की बोलायचं नाही. रात्र झाली की दुकान बंद होईल. मग केक खाऊन टाकायचा. खाऊन झालं की आतल्या टेबलावर झोपायचं, आणि सकाळी दुकान उघडलं की पळून यायचं. '

' हट्. काहीतरीच. ' अप्पू पुटपुटला.

' काहीतरी नाही मी करून दाखवीन. लावतो पैज ? ' झंप्यानं कॉलर ताठ केली.

' पैज, पैज. ' सगळी मुलं ओरडली. सगळ्यांची पैज ठरली. झंप्यानं त्या कपाटात जाऊन जर केक खाऊन दाखवला, तर अप्पूनं त्याला आपल्या जवळचे सगळे स्टॅम्प्स् द्यायचे. टप्पूनं आपला नवा कोरा अल्बम द्यायचा. बव्यानं एक डझन रंगीत गोट्या द्यायच्या आणि बबलूनं त्याची लगोरी द्यायची. सगळ्यांनी हातावर हात ठेवून वचन दिलं. पैज नक्की केली. मग झंप्या म्हणाला, ' मंडळी, आपण सगळे जिगर दोस्त. तुम्ही माझं एक काम करायचं. आज या पैजेसाठी मला इथंच राहावं लागेल. म्हणजे आज मी हरवणार. तर तुम्ही कुणी घरी सांगायचं नाही. '

'मग आम्ही काय रे सांगायचं? झंप्या मेला म्हणून?' टप्पूनं विचारलं.

'मला कुणी मेलेलं आवडत नाही बाबा. मला तर रडायलाच येईल.' बबलूनं आत्ताच गळा काढला.

'ए, चूप.' झंप्यानं त्याला गप्प केलं. 'तू काही बोलूच नको ना. तू आपला गुपचूप जाऊन झोप घरी.' झंप्यानं त्याला सांगितलं.

'आम्ही सगळेच गुपचूप जाऊन झोपतो रे.'

सगळी मुलं घरी जायला निघाली. आठ वाजत आले होते. दुकानं बंद व्हायची वेळ झाली होती. तरी गर्दी होतीच. लोक केक विकत घेत होते. कुणी कुणी दुकानात शिरून काही काही खात होते. पेयं घेत होते. झंप्यानं क्षणभर विचार केला. आपले मित्र दूर गेलेले पाहिले. शर्ट पँटमध्ये खोवला. केस सारखे केले, आणि ऐटीत दुकानात शिरला. त्याच्यापुढे काही मुलं चालली होती. त्यांच्या मागोमाग जिना चढून गेला. कोपऱ्यातल्या एका टेबलाशी माणसं बसली होती. तिथेच एक रिकामी खुर्ची घेऊन तो बसला. त्या लोकांनी पॅटिस मागवले. त्यांच्याबरोबर तीन मुलं होती. वेटरनं त्या मुलांबरोबर झंप्यापुढेही पॅटिस आणून ठेवला. ती बरीच मंडळी होती, त्यामुळं झंप्या त्यांच्यांत खपून गेला, तोदेखील काही न बोलता गुपचूप पॅटिस खाऊ लागला.

साडे आठ वाजायला आले. दुकान रिकामं होऊ लागलं. सगळी मंडळी उठली. मुलं, बायका, पुरुष खाली उतरले. झंप्यानं इकडे तिकडे पाहिलं. अगदी कोपऱ्यात एक कपाट ठेवलं होतं. त्याच्या बाजूला एक दोन जुन्या खुर्च्या घडी करून ठेवलेल्या होत्या. झंप्या चट्‌कन त्या कपाटाच्या आडोशाला गेला. अंग आक्रसून लपून राहिला. आपण कुणाला दिसून चालणार नाही हे त्याला कळत होतं.

एवढ्यात दोन वेटर्स वर आले. त्यांनी भराभर खुर्च्या आवरल्या. टेबलं एका बाजूला सरकवली. झंप्याला मात्र दरदरून घाम फुटला. कुणी आपल्या पाहिलं मग? बेदम मार खावा लागेल. त्या आवरा-आवरीत धुळीनं झंप्याला शिंक यायला लागली. तो तोंड वेडेवाकडे करीत शिंक दाबून धरू लागला. तेवढ्यात ते दोन्ही वेटर्स धडाधडा

जिने उतरून खाली गेले. नंतर त्या लोकांचे खाणे झाले. गल्ल्यावरचा माणूस नोटा मोजत होता. पैशाचा हिशेव मांडत होता. एवढ्यात त्याची बायको आली. मग तिनं सगळ्या कामगारांना कसले तरी पैसे वाटले. झंप्या फटीतून दिसेल तेवढं हळूच वघत होता. झंप्याला आणखी एक गंमत बघायला मिळाली. दोघं वेटर्स मागच्या बाजूला गेले. तिकडे कुणीतरी एक पोऱ्या उभा होता. त्याच्या हातांत त्यांनी कसल्यातरी दोन बाटल्या दिल्या. तो पोऱ्या मागच्या अंधारात कुठेतरी पळत गेला. झंप्याला वाटलं, चोर म्हणून जोरात ओरडावं. पण आपण लपून बसलोय हे त्याच्या लक्षात आलं. तो तोंड दाबून गप्प वसला. हळूहळू दुकान शांत झालं. मालक मालकीण कुलूप लावून बाहेर पडली. सगळीकडे सामसूम झालं. झंप्या हळूच जिन्यावरून खाली उतरला. वरच्या शटरमधून बाहेरचा थोडासा उजेड आत येत होता. लोकांचे आवाजही येत होते. झंप्या तेवढ्या आधारावर धीरानं एक एक पाऊल पुढे टाकत होता. तो काचेच्या कपाटापर्यंत आला आणि एवढ्यात जोरात बाहेर गलका ऐकू आला. झंप्याची दातखिळीच बसली. नक्की आपल्यालाच कुणीतरी शोधायला आलंय, तो भीतीनं खालीच बसला. मनातल्या मनात जोरजोरात देवाचा धावा करू लागला--

'धाव रे रामराया...'

झंप्याचा निरोप घेऊन मुलं निघाली. रस्त्यातून तो चूपचाप चालली होती. झंप्या रात्रभर तिथं कसा राहणार? पण झंप्या शूर आहे, राहीलदेखील, आणि मग? तो एकटा अख्खा केक खाणार? म्हणजे तो डोंगराएवढा, सबंध केक? काय मज्जा! मग झंप्या सबंध केकचाच होईल. आपल्यासाठी केक आणील का तो?....मुलं आपल्याच विचारात मग्न होती. कुणी कुणाशी बोलत नव्हतं. चाळ जवळ आल्यावर सर्वजण आपआपल्या घरी गेले. रात्री दहा वाजता झंप्याची आई शोधत शोधत आली. कुठं गेला झंप्या? कुठं हरवला? कुणाबरोबर गेला होता? सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. अप्पूनं कानावर हात ठेवले, टप्पू पांघरुणात डोकं खुपसून गप्प पडून राहिला. बबलू एवढा घाबरला होता की, त्याच्या तोंडातून शब्दच बाहेर पडेना आणि केव्हातरी

बाब्याचा मोठ्यानं रडण्याचा आवाज आला. बाब्याच्या आईनं त्याला हलवून उठवलं. 'काय झालं रे ?'

'काही नाही.' बाब्या रडत रडत म्हणाला.

'देव मला पाप देईल. मी काही सांगणार नाही झंप्याबद्दल.' त्याच्या ह्या बोलण्यानं आई एकदम नीट बसून ऐकायला लागली. कारण झंप्या हरवल्याची बातमी चाळभर झाली होती. बाब्याच्या आईनं इतरांनाही बोलावलं. बायकांचा हाऽ कलकलाट सुरू झाला. बाब्या आणखीच गडबडला. आणि त्यानं जोरात गळा काढला. एव्हाना झंप्याची आईही तिथं आली होती. त्या रडण्यानं ती गडबडली. आपलं पोर महागुणी आहे हे तिला माहीत होतं. झंप्या कुठं खाडीत तर पडला नाही ? गाडीखाली तर सापडला नाही ? बाब्याला जवळ घेऊन विचारलं, तुम्ही संध्याकाळी फिरायला गेला होतात ना ?'

बाब्यानं रडता रडता मान हलवली.

'कोण कोण होतं बरोबर ?'

'अप्पू होता. टप्पू होता. बबलू होता...ऊं ऊं ऊं.'...बाब्या रडतच होता. मग अप्पू आला. टप्पू आला. बबलू आला. त्यांच्या आया आल्या. सगळ्यांचे वडील आले. बाब्याच्या खोलीसमोर गर्दीच गर्दी झाली. पोरं काही नीट उत्तरं देईनात. शेवटी टप्पूच्या वडिलांनी ढम्कन् त्याच्या पाठीत एक गुद्दा ठेवून दिला. त्या मारानं टप्पूनं जोरजोरात रडायला सुरुवात केली. माराच्या भीतीनं बाकीच्या पोरांनीही गळे काढले. काय झालंय आणि काय करावं कुणालाच कळेना. एवढ्यात कुठूनसा संजूदादा आला. कोपऱ्यात उभ्या असलेल्या बबलूला त्यानं हळूच जवळ घेतलं. बबलू जाम घाबरला होता. संजूदादाला बघून त्याला धीर आला. संजूदादा त्याला घेऊन तिथून बाहेर गेला आणि म्हणाला, 'बबलू, मला झंप्या भेटला होता.'

'खरंच ? कुठं होता रे ? कपाटातच ? आणि त्यानं सगळा केक संपवलाय का थोडा शिल्लक ठेवलाय ?'

संजूला काहीच कळलं नाही. कुठला केक ? कसलं कपाट? काहीतरी गडबड आहे हे त्याच्या लक्षात आलं. या छोट्याला थोडं आडून

विचारलं तर सगळं कळेल हे त्याच्या लक्षात आलं. तो मुद्दामच म्हणाला, 'सगळा केक कसा खाईल झंप्या ? थोडा तुमच्यासाठी ठेवलाय ना !'

'खरंच ?'

'अगदी खरं. आणि झंप्या म्हणाला, तुम्ही सगळेजण केक खायला या.'

'सगळे म्हणजे ? टप्पू आणि अप्पू–'

'हो, हो, सगळे, सगळे.'

'चल मग जाऊ या केक खायला.'

'अरे पण कुठं जायचं ? मला तर रस्ता माहीत नाही.'

'हॅ ! त्यात काय ?' बबलू हसत म्हणाला.

'अप्पूला रस्ता माहिती आहे. टप्पूला पण माहिती आहे.'

मग संजूदादानं अप्पू, टप्पूलाही बरोबर घेतलं. चाळीतल्या मंडळींना मुद्दामच तिथं थांबायला सांगितलं. मात्र झंप्याचे आईबाबा बरोबर होतेच. एव्हाना रात्रीचे बारा वाजून गेले होते. झंप्याची आई मनात देवाचा धावा करीत होती आणि पदरानं नाक डोळे पुसत होती. टप्पू मात्र काहीबाही बडबडत होता.' बघ संजूदादा, झंप्यानंच पैज मोडली. आम्हाला म्हणाला होता कुणाला सांगू नका. आणि त्यानंच तुला सांगितलं ना ?'

'पण काय रे, त्याला केक खाताना तू पाहिलास ? आणि तो काचेतला मुलगा कुठाय आता ?'

संजूदादा सुचेल ते उत्तर देत होता. सगळ्यांच्या एवढं लक्षात आलं होतं की झंप्या कुठल्यातरी दुकानात राहिलाय. केक खातोय. पण पैज कसली ? काचेचं कपाट कुठलं ? त्यातला मुलगा कोण ? कसलाच उलगडा होत नव्हता.

मंडळी त्या मोठ्या दुकानासमोर आली तेव्हा साडेबारा वाजले होते. रस्ता शांत होता. बसेस्‌ची वर्दळ थांबली होती. सगळीकडे शांत होतं. त्या दुकानाचा शटर बंद केलेला होता. आणि खाली भलं मोठं कुलूप लावलेलं होतं. ते कुलूप बघून झंप्याची आई मट्‌दिशी खालीच बसली.

'कुठं आहे झंप्या ?' झंप्याच्या वडिलांनी विचारलं. एक मिनिटभर मुलंही गप्पच झाली.

'नक्की हेच दुकान ना ?' संजूदादानं विचारलं.

'म्हणजे काय संजूदादा. हेच हेच दुकान. आमची इथंच तर पैज लागली.'

'कसली पैज ?'

'केक खाण्याची.' आणि मग अप्पूनं आणि टप्पूनं मिळून सगळी हकीकत संजूदादाला सांगितली. ती हकीकत ऐकून सगळे आणखीच काळजीत पडले. बंद दुकानात झंप्या कसा असणार ? कुणीतरी त्याला नक्कीच हाकलला असेल. कदाचित चोर म्हणून मारलंही असेल किंवा पोलिसांच्या ताब्यात दिलं असेल.

हळूहळू आजूबाजूची पत्ते खेळणारी पोरं आली. तेवढ्यात समोर बस आली. कंडक्टर खाली उतरला. सर्वांची चौकशी सुरू झाली. कुणीतरी त्या दुकानदाराचा पत्ताही सांगितला. संजूदादानं समोरची एक टॅक्सी पकडली आणि तो दुकानदाराच्या शोधाला गेला. कंडक्टरनं पोलिसांत फोन करतो असं आश्वासन दिलं. माहीम डेपोत बस पोचवून कंडक्टर आणि ड्रायव्हरही मदतीला धावले. झंप्याचे वडील तिथं होतेच. पोलीस ठाण्यावर कुणी मुलगा रात्री आला नव्हता. तशी नोंद नव्हती. दुकानदारानं कुणाला घालवून दिलं नव्हतं, असं फुटपाथवरच्या एका पोऱ्यानं सांगितलं. तो त्या दुकानातच कामाला होता म्हणे. म्हणजे झंप्या नक्कीच आत असला पाहिजे. मग एवढा गलका होऊनही तो आवाज कसा देत नव्हता ? कुणीतरी फायरब्रिगेडला फोन केला होता. ढाण् ढाण् घंटा वाजवत गाडी येऊन थडकली. संजूदादाही दुकानाच्या मालकाला घेऊन तिथं हजर झाला. मालकानं कुलूप काढलं. शटर वर गेला. सगळ्यांचं लक्ष एकदम समोरच्या काचेकडं गेलं. त्या काचेच्या आत मातीचा बाहुला होता तिथंच होता. केकचे तुकडे सगळीकडे विखुरले होते आणि क्रीमनं आणि केकनं माखलेला झंप्या गाढ झोपी गेला होता. स्वप्नात तो बहुतेक केकच्या डोंगरावर गेला असावा. एवढा मोठ्ठा गलका आणि आरडाओरडा ऐकून झंप्या जागा झाला. खडबडून

उठला. आपण कुठं आहोत हेच त्याला कळेना. पण अप्पू, टप्पूला समोर बघून तो एकदम ओरडला, 'दे आता स्टॅम्प्स ! मी पैज जिंकली की नाही ?' कुणी काहीच उत्तर देत नव्हतं. पण झंप्याचा तो केकमय अवतार बघून अप्पू टप्पू भलतेच खूष झाले. त्यांना झंप्याचा जाम हेवा वाटला. एवढ्यात दुकानदार पुढे झाला आणि झंप्याच्या बखोटीला धरून त्यानं त्याला खस्‌कन बाहेर ओढलं. 'गधा कहींका.' तो जोरात ओरडला. झंप्या रागारागानं बोलला, 'हमको कैकु रागावता है ? हमने तर पैज जिक्या है ना !'

दुकानदार झंप्याकडे आश्चर्यानं पाहतच राहिला. तेवढ्यात झंप्याचे वडील पुढे झाले. पोलीस इन्स्पेक्टरही आले. त्यांनी सगळ्या लोकांना मागं हटवलं. संजूदादाकडून त्यांना बरीचशी हकीकत कळली होती. त्यांनी दुकानदाराची समजूत घातली आणि तेवढ्या रात्री दुकानदाराला बरोबर घेऊन झंप्या आणि मंडळी पोलीस इन्स्पेक्टरसह झंप्याच्या घराकडे निघाली.

चाळीत मंडळी पोचली तेव्हा पहाटेचा कोंबडा आरवत होता. झंप्यानं घडलेली हकीकत मोठ्या धीटपणं सर्वांना सांगितली. ती ऐकून दुकानदार आणि पोलीसही थक्क झाले. वारे पठ्ठे ! पोरगं असावं तर असं धीट ! पोलीस इन्स्पेक्टरनी झंप्याची पाठ थोपटली. मग चाळीतल्या लोकांनी पैसे जमवून दुकानदाराला नुकसानभरपाई तर दिलीच. पण सर्व मंडळींना कॉफीही पाजली.

दुसरे दिवशी झंप्याचा पराक्रम ऐकायला अनेक साहित्यिक आले. कुणी मुलाखत घेत होतं, कुणी त्याचा पराक्रम ऐकत होतं, एवढ्यात दुकानाचा मालक भला मोठा केक घेऊन घरात शिरला. झंप्या त्याच्यावर फार रागावला होता. आपल्याला गाढव म्हणणारा हाच तो माणूस हे त्यानं ओळखलं. पण तो मालक झंप्याजवळ आला आणि म्हणाला, 'बेटा, तू तो लई चलाख हाय. तुला आमी हे बक्षीस आणला बघ !'

'खरंच !' झंप्याचे डोळे लुकलुकले. सगळ्या मुलांनी आनंदानं टाळ्या वाजवल्या. आणि झंप्या धावत स्वैपाकघरात जाऊन उचटणं

घेऊन आला. केक कापायची त्याला कोण घाई झाली होती. मध्येच संजूदादा ओरडला, 'थांब झंप्या, मी तुझा फोटो काढतो!

उचटणं घेऊन केक कापणारा झंप्या आणि टाळ्या वाजवणारी मुलं, असा मग फोटो काढला गेला. झंप्यानं केकचा पहिला तुकडा कापला मात्र, कुणीतरी ओरडलं,

'केकबहाद्दर झंप्या–' सगळ्यांचं लक्ष दाराकडं गेलं. पैज जिंकणाऱ्या बहाद्दर झंप्यासाठी इन्स्पेक्टरसाहेब आणखी एक केक घेऊन आले होते. मग काय विचारता? मौजच मौज. सगळी मुलं जोरात ओरडली––

'केकबहाद्दर झंप्या–

झिंदाबाद! झिंदाबाद!! झिंदाबाद!!!'

• • •

## ६. फायटर झंप्या

आता झंप्या जरा मोठा झाला होता. 'आई, मी आता शहाणा झालोय हं ! तू मला उगीच रागावत जाऊ नको बघ–' असं आईला बजावायचा. आईनं न सांगताच तिच्या हाताशी मदत करायचा. आणि वर म्हणायचा, 'हे बघ, मला ते बबल गम् खायला पैसे देऊ नकोस. मी आता मोठा झालोय. तू कुठलंही काम सांग, असं चट् की फट् करून टाकीन–'

आई आपली पोटभर हसायची. मग त्याला काही ना काही कामं सांगायची. एकदा झंप्या असाच महत्त्वाच्या कामाला गेला होता. मिरची-कोथिंबीर आणायला झंपूराव बाजारात गेले. इकडे आई आपली वाट बघत बसली. झंप्याचा पत्ताच नाही. पहिल्यांदा तिला खूप राग आला. मग मात्र काळजी वाटायला लागली. कुठं गेला बाई हा ? मित्राकडे का गेला असेल ? बाजारात तर रमला नसेल ? नाहीतर... अगबाई गाडीखाली तर सापडला नसेल ना ? आई घाबरली. बाळाला आतल्या खोलीत झोपवलं, दाराला कडी-कुलूप केलं आणि रस्त्यानं शोधत निघाली.

वाटेत भेटला सोन्या. म्हणाली, 'सोन्या रे, झंप्या दिसला का आमचा ? केव्हाचा गेलाय मिरची-कोथिंबीर आणायला.'

तशी सोन्या हसत म्हणाला, 'झंप्याची आई, अहो काय मज्जा ! झंप्या गेलाय आकाशात.'

झंप्याच्या आईचं काळीजच हललं. अग बाई, हे वेडं गेलं तरी कुठं ? तिनं सोन्याला बरोबर घेतलं आणि झंप्याला शोधण्यासाठी धावत

सुटली. समोरच्या चाळीत एक बाई न्हाणीघरामध्ये अडकून पडली होती. चिक्कार आरडा–ओरडा चालला होता. बरीच मंडळी जमली होती. पण बाईला बाहेर काढायची कशी, कुणाला कळेना. त्या बाईचा धाकटा मुलगा भोकाड पसरून रडत होता. म्हाताऱ्या–कोताऱ्या बायका मोठमोठ्यानं बडबडत होत्या. पुरुष आपसात चर्चा करीत होते.

'अहो फायर ब्रिगेडला कळवा.'

'नाहीतर दार फोडून आत जाऊ या ना!'

'अहो, पण बाई न्हाणीघरामध्ये अडकून पडली आहे. ह्या कारट्यानं बाहेरनं कडी लावून आईला कोंडलं म्हणे, आणि दार पुढे ओढून आपण खाली धावत आला. बाहेरच्या दाराला अंगचं कुलूप आहे. आपोआप लॉक झालं की दार.'

'महा अवलक्षणी कारटं.' एका बाईनं त्या लहान मुलाला धपाटा मारला. ते आणखी गळा काढून रडायला लागलं.

एवढ्यात झंप्या येऊन त्या गर्दीत मिसळला. मोठ्या एकाग्रतेनं तो सगळं ऐकत होता. त्या बाईनं मुलाला मारलेलं बघताच तो संतापला. ऐटीत पुढे होऊन म्हणाला, 'अहो बाई, मारता काय त्याला? तुम्हाला कळतं का?'

'तुला फार कळतं; गप्प बस शेंबड्या. ती बाई आत अडकलीय्. तिला काढ बाहेर. मोठा पुळका दाखवतोस!'

झंप्या छाती काढून म्हणाला, 'हो हो, काढीनच बाहेर.'

सर्वजण झंप्याकडे आश्चर्यानं बघायला लागले. मग एका माणसानं विचारलं, 'तुला झाडावर तरी चढता येतं का?'

झंप्या म्हणाला, 'हो तर.'

चाळीला लागून चांगलं उंच झाड होतं. झाडाच्या फांद्या चाळीच्या गॅलरीला टेकल्या होत्या. तिथून गॅलरीत उडी टाकली तर सरळ घरात जाता येत होतं. पण असलं धाडस करायचं कुणी? फांद्यांच्या टोकाला जायचं म्हणजे धोका होता. लोकाचं पोर. कोण भलती जबाबदारी घेणार? सगळे चुपचाप झाले.

लोक आपसात विचार करीत होते. एवढ्यात झंप्या सर् सर् झाडा-

वर चढलादेखील. मुलांनी टाळ्या पिटल्या. 'झंप्या आकाशात गेला, झंप्या आकाशात गेला.' झंप्याने 'हुई ऽऽ' करून ओरडून सगळ्यांना हात हालवून दाखवला. मोठी माणसं ओरडली, 'अरे पडशील. बेतानं रे बाबा.'

झंप्या वरपर्यंत पोचला खरा, पण आता पुढे गॅलरीशी पोचणार कसा तो? उडी मारणार तिथून? शेंड्यापर्यंत चढून जाणार? आणि पडला तर? मोठी माणसं घाबरली. एक-दोघांनी धावत जाऊन घरातून जाजमं आणली. ती पसरून सगळेजण झंप्याकडे पाहत उभे राहिले. तो पडलाच तर वरच्यावर झेलता यावा म्हणून हा प्रयत्न चालला होता!

आता झंप्यानं फांदीवर पाय रोवला. हाताची पकड घट्ट केली. सावधपणे तो पुढं पुढं येऊ लागला. एवढा वेळ नाचणारी पोरं आता गप्प झाली. मोठ्यांचे श्वास वरच्या वर राहिले. सगळ्यांचे डोळे झंप्याकडे लागले होते. झंप्या तुरुतुरु तुरुतुरु पुढे चालला होता. एवढ्यात झंप्याची आई आणि सोन्या तिथं येऊन हजर झाले. आपला मुलगा माकडासारखा वर चढला आहे हे बघून त्या माऊलीच्या जिवानं ठाव सोडला. खरं तर तिच्या तोंडून किंकाळीच बाहेर पडायची, पण तिनं तोंडावर हात घट्ट दाबून धरला. आपण ओरडलो तर झंप्या बावरेल, खाली पडेल, हे तिच्या लक्षात आलं. देवाचा धावा करीत ती पण वर पाहू लागली.

झंप्या पुढेंपुढे सरकत होता. मोठ्या सावधपणं झेपावत होता. त्याची हालचाल खारीसारखी चपळ होती. डोळे घारीसारखे हव्या त्या ठिकाणाचा वेध घेत होते. झंप्या अगदी टोकाशी आला. फांदी कमरेत वाकलेल्या म्हातारीसारखी वर-खाली लवली आणि त्याचवेळी काड्काड् असा आवाज झाला. झंप्याच्या आईनं घाबरून गच्च डोळे मिटले. 'होऽ' करून एकच ओरड झाली. लोकांनी पाहिलं– त्याचवेळी गॅलरीतून झंप्याची विजयाची आरोळी आली. फांदी मोडण्यापूर्वीच झंप्यानं गॅलरीत उडी टाकली होती.

गॅलरीतल्या उघड्या दरवाजातून झंप्या आत शिरला. भराभरा आत जाऊन त्यानं न्हाणीघराची कडी उघडली. बाहेरचं दार उघडलं.

एवढ्यात खाली उभी राहिलेली मंडळी छोट्या मुलाला घेऊन वर धावत आली. ती बाई वेगानं पुढे झाली. आपल्या मुलाला तिनं उचलून घेतलं. झंप्याला जवळ घेऊन त्याला प्रेमानं थोपटलं. इतक्यात झंप्याची आई वर आली. सुखरूप मिळालेल्या आपल्या मुलाला घट्ट पोटाशी धरून ती आसवं गाळायला लागली.

खिसाभर खाऊ घेऊन झंप्या उड्या मारत घराकडे निघाला. आई मात्र डोळे पुसत सांगत होती, 'झंप्या असं वागू नये रे ! पडला असतास मग ?'

'पडेन कसा ? आई, मी मर्द मावळा आहे. तू आमचा इतिहास वाच. तानाजीनं हेऽ सटॅक्न् घोरपड टाकली आणि सर्सर् वर चढत गेला. खरं तर आई, मला लढाई करायला पाहिजे होती. हे ठिशाँव, ठिशाँव...'

आईनं कपाळावर हात मारून घेतला. आपलं हे वेडपट पोर कधी शहाणं होणार याची तिला काळजी वाटू लागली. त्या दिवसापासून आई झंप्याला फार जपू लागली. एकट्याला फारशी बाहेर सोडायचीच नाही आणि आपण बाहेर जाताना चार-चारदा सांगून जायची, 'जपून राहा रे. कुठे पराक्रम गाजवू नको बाबा.' झंप्या पटकन् सांगायचा, 'आई तू बिनधास्त जा. हम है.'

झंप्याचं राष्ट्रभाषेचं प्रेम आईला माहीत होतं. त्याचं हिंदीचं ज्ञान ऐकण्यात वेळ न घालवता आई कामाला बाहेर पडायची. एकदा एक मोठी कथाच झाली—

ती दुपारची वेळ होती. पुरुष माणसं कामावर गेली होती. मोठी मुलं शाळा-कॉलेजला गेली होती. म्हाताऱ्या-कोताऱ्या जेवून डुलक्या घेत होत्या. आया-बाया पडल्या पडल्या मासिकं चाळत होत्या. तसं सामसूमच होतं. झंप्या सकाळची शाळा आटोपून घरी आला होता. आई दुधाला निघाली होती. बाळाजवळ दोन-चार मोडकी खेळणी टाकून झंप्या मिनिकार फिरवत होता. बाबा घरात असताना ही कार त्याला कधीच मिळायची नाही. आई पण ओरडायची, 'लहान का घोड्या तू खेळणी घेऊन खेळायला ?' खरं तर झंप्याला ती कार सुटी करायची होती. ती कशी चालते ते बारकाईनं पाहायचं होतं. आज आई दूध आणा-

यच्या गडबडीत होती. आईनं पायात चपला अडकवत सांगितलं, 'झंप्या मी दूध घेऊन येते रे. बाळाकडं लक्ष ठेव आणि उधळू नकोस कुठं बाहेर.'

'हो ग आई–' म्हणत झंप्या आपल्या कार्याला लागला. एक एक करीत त्यानं कारचे सगळे भाग सुटे केले. एवढ्यात गर्ररऽऽटाक्‌कन आवाज झाला. स्प्रिंगच तुटली. झंप्याला जाम भीती वाटली. आई ग! कार मोडलीच की! आता खा मार. पण झंप्या मोठा शहाणा. त्यानं भराभर सगळे तुकडे गोळा केले आणि बाळाच्या अंथरुणाशी ठेवून दिले. बाळानंच मोटार मोडली असं आईला सांगायचं ठरवलं आणि आपण त्या गावचेच नव्हे, असा चेहरा करून तो मुकाट पडून राहिला.

बाहेरच्या दाराची कडी वाजली. त्याला नक्की वाटलं, आईच आली. त्यानं गप्‌कन डोळे मिटून घेतले. झोपेचं सोंग आणलं.

अरे पण आई आत का येत नव्हती? वाटल्यांचा आवाज नाही. चपला कोपऱ्यात टाकल्याची जाग नाही. 'झंप्या, गाढवा झोपलास का?' ही ठराविक हाक नाही. त्यानं हळूच डोळे किलकिले करून पाहिलं आणि बाप रे!

कोण शिरलं होतं घरात? कुणीतरी वेगळाच माणूस. मोठ्ठा, उंच काळा. केवढाल्या त्या त्याच्या मिशा! आणि हे काय? तो चक्क कपाट उघडत होता की! झंप्याला दरदरून घाम फुटला. चोरच हा! नक्की चोर. पळून जावं का? मग बाळाचं काय होईल? आणि त्या चोरानं बाळाला मारलं तर? झंप्याला वाटलं, मोठ्यांदा ओरडावं. पण त्या चोरानं आपल्यालाच धरून बुकललं तर? झंप्याला काही सुचेना! रडावं वाटलं. पण रडू येईना. ओरडावं वाटलं. पण आवाज फुटेना. तो नुसताच डोळ्यांच्या बारीक फटीतून पाहत होता. चोराच्या हालचाली टिपत होता. चोरानं आपल्या पिशवीत भराभरा सामान कोंबलं. आईच्या लुगड्याखाली ठेवलेल्या नव्या करकरीत नोटांचं पुडकं. झंप्या अस्वस्थ झाला. स्वत:शीच म्हणाला, 'अरे झंप्या, तुझा धिक्कार असो. एवढा चोर घरात शिरलाय आणि तू गप्प राहिलायस्? हॅट वायल्या! पेळू.'

झंप्या ताड्‌कन उठून बसला. तेवढ्यात चोर बाहेर पडत होता.

ा ठो बोंब ठोकली आणि पुढचा मागचा कसलाही विचार
ता चोराच्या मागे धावला. पण घराबाहेर पडण्यापूर्वी त्यानं बाळ झोपला होता, त्या दाराला कडी घातली आणि 'चोर चोर' असं ओरडत धावत सुटला.

चाळ खडबडून जागी झाली. रस्त्यावर उभी असलेली पोरं जागची हलली आणि मग हीऽ पळापळ सुरू झाली. पुढे चोर, मागून रस्त्यावरचे लोक. हळूहळू घोळका वाढू लागला. चोर माहीतगार होता. गल्ली-बोळातून धावत होता. लोकांना हुलकावणी देत होता. मध्येच मंडई आली. त्या गर्दीत चोर सटकला. लोक इकडं तिकडं पाहू लागले. पण झंप्या मोठा हुशार. तो एखाद्या तीरासारखा धावतच होता. त्यानं चोराला बरोबर पाहिलं होतं. भाजीवाल्यासमोर फारशी गर्दी नव्हती. तरीदेखील एका कांदे-बटाटेवाल्यापुढे झंप्या जाऊन उभा राहिला. बटाटे घेण्यासाठी उभ्या असलेल्या एका माणसाला घट्ट पकडत ओर-डला, 'चोर ! चोर ! हाच चोर आहे.' त्या माणसानं झंप्याला जोरात बाजूला ढकललं. 'हॅट्, बाजूला हो.' पाठीमागून लोक येतच होते. झंप्या खाली पडला. पण त्यानं प्रसंगावधान राखून त्या माणसाच्या पायाला घट्ट मिठी मारली. त्या माणसानं सुटण्यासाठी जोरात पाय झाडला. आता मात्र झंप्या कळवळला. पण चिडला. जिवाच्या आकांतानं त्यानं त्या माणसाच्या पायाचा करकचून चावा घेतला. तो माणूस विव्हळला. तेवढ्यात भाजीवाल्यानं उडी घेऊन त्या माणसाचं मानगूट पकडलं. लोक जमले. शिपाई आले. तो माणूस मोठ्यानं ओरडतच होता, 'सोडा मला. हे कुठलं कोण पोरटं. ते सांगतं काय नि तुम्ही पकडता काय.'

मातीनं लडबडलेला झंप्या नाक पुसत पुसत रडक्या आवाजात ओर-डत होता, 'खोटं बोलू नका चोरकाका. तुम्हीच माझ्या घरी चोरी केलीत. कपाट उघडून साड्या घेतल्यात, पैसे घेतलेत. मी पाहिलं. ती बघा त्यांच्या हातात पिशवी आहे ना, त्यात माझ्या बाबांचे शर्ट आहेत. तुम्ही किती पळापळ केलीत तरी तुमच्या मिशांवरून मी बरोबर ओळखलं.'

शेवटी पोलिसांनी त्या माणसाला ताब्यात घेतलं. झंप्या, तो भाजी-वाला, आजूबाजूची माणसं, झंप्याची आई ही सगळी वरात पोलीस-

स्टेशनवर गेली. पोलिसांना सगळ्या वस्तू [illegible] अडकवत सांगितलं, ‘ झंप्या आपल्या वस्तू ओळखल्या. चोराला चांगलाच मार [illegible]ळ नकोस कुठं बाहेर.’ झंप्याचं नाव, पत्ता सगळं लिहून घेतलं. झंप्याला घेऊन [illegible]. एक एक घरी परत आली. रस्त्यात सगळी माणसं कौतुक करीत होती, ‘ काय[illegible] हुशार पोर आहे पाहा ! नाहीतर आमची मुलं! ’ कौतुक ऐकून झंप्याची कॉलर अगदी ताठ झाली होती. चोराची बसलेली लाथ तो साफ विसरून गेला. तोंडावरचा चिखल पुसत तो आईला कित्ती कित्ती सांगत होता, ‘ किनई आई, काय मज्जा झाली ठाऊकाय...’ पण आई काही ऐकण्याच्या मन:स्थितीतच नव्हती. तिनं घरी आल्या आल्या झंप्याला प्रेमानं हृदयाशी धरलं आणि गहिवरून म्हणाली, ‘ माझं शहाणं ग बाळ ते ! ’ झंप्याला अतिशय आनंद झाला. आपली आई आपल्याला शहाणा म्हणतेय हे त्याला खरंच वाटेना आणि गंमत म्हणजे आई चक्क रडत होती. आपण शहाणे झालो म्हणून आई रडतेय याची झंप्याला फार मौज वाटली. आईच्या कुशीत डोकं घुसळत झंप्या हळूच म्हणाला, ‘ आई ग, मी खूप शहाणा आहे. पण थोडासा वेडा आहे बघ. मी किनई, बाळाची मिनिकार मोडली. पण तू मला मारणार नाहीस ना ? ’ झंप्याची आई खुद्कन हसली. म्हणाली, ‘ वेडं ग बाई माझं.’

आता मात्र झंप्या बुचकळ्यात पडला. आपण वेडे की शहाणे ? पण एवढ्यात त्याची वानरसेना ओरडत आली, ‘ झंप्या द ग्रेट झिंदाबाद ! झंप्या की जय ! ’ झंप्या धावत बाहेर पळाला. खूप आनंदानं त्यानं उडी मारली. त्याला नक्की कळलं, आपण शहाणेही नाही आणि वेडेही नाही पण आपण ग्रेट मात्र निश्चित आहोत !

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ९४०५४ नों. दि ..........
वि. [illegible] क्र. ..........

IRBK-0117054
IRBK-0117054